२०१२

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

विषय ... कला ...

दा. क्र. २०१२

BVBK-0402012

वा. वा. प्रमोदमाला

२०१२

BVBK-0402012

प्रास्ताविक

मुलांना खेळाप्रमाणेच वाचनाची अत्यंत आवड असते. म्हणूनच घरात हाती पडेल ते पुस्तक ती तन्मयतेने वाचून काढतात. परंतु प्रौढवाचकांसाठी असलेल्या घरातील पुस्तकांचे त्यांना योग्य तऱ्हेने आकलन होत नाही. इतकेच नव्हे तर, कधी कधी प्रौढांना योग्य असणाऱ्या पुस्तकांच्या वाचनामुळे मुलांच्या मनावर अनिष्ट संस्कारही उमटण्याची भीती असते. या मूलभूत गोष्टी लक्षात घेऊन गेली दोन-तीन दशके बाल, किशोर व कुमार या वयोगटांतील वाचकांसाठी पुस्तकांची खास निर्मिती करण्याचे प्रयत्न चालू आहेत व ते यशस्वीही झाले आहेत. काही प्रकाशकांनी तर प्रौढ साहित्याच्या प्रकाशनामुळे होणाऱ्या नफ्याचा मोह टाळून भावी पिढीला मनानें निकोप करण्यासाठी केवळ मुलांसाठीच आपले प्रकाशन राबविण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. अशा प्रकाशकांच्या बरोबरीने आता श्री. नरेंद्र अरगडे यांचे 'निर्मल प्रकाशन' पुढे सरसावले असून, आतापर्यंत त्यांनी मुलांसाठी काही उल्लेखनीय पुस्तके प्रकाशित केली आहेत आणि ती लोकप्रियही झाली आहेत.

निर्मल प्रकाशनाचे श्री. नरेंद्र अरगडे हे तरुण, आकांक्षी व अत्यंत कल्पक प्रकाशक आहेत. त्यामुळे 'प्रमोदमाला' या कादंबरिकेची कल्पना त्यांच्या मनात रुजली व त्यांनी मला या मालेचे संयोजन करावयास सांगितले. राक्षस, पऱ्या, राजपुत्र किंवा प्राणीजगत् यांबद्दलच्या कथा बालवाचक नेहमीच वाचतात. परंतु त्यापेक्षा त्यांना अधिक जवळचे वाटेल असे काही-

तरी नवीन या मालेच्या द्वारे देण्याचा प्रयत्न केला आहे. या माले-मध्ये मुलांचे क्रिकेटसारखे आवड़ते खेळ, कुत्र्यामांजरासारखे लाडके पाळीव प्राणी यांच्या कथानकाबरोबरच, कोल्हाटी समाजातील आणि घरांतल्या मंडळींनी कठोर वागणूक दिल्यामुळे वाट चुकून वेदरकार झालेली मुले यांचाही समावेश केला आहे. कादंबरिकांतील कथावस्तूमध्ये विविधता असून प्रत्येकीचे आगळे रंगरूप, चटकदार स्वभावचित्रण व सुबोध निवेदन-शैली या गुणांमुळे छोटयांना या कादंबरिका अतिशय आवडतील असा विश्वास वाटतो.

राम नावाच्या एका सालस, अनाथ पण खिलाड़ू छोटया विद्यार्थ्याची कहाणी श्री. मनोहर कुपेरकर यांनी ' आनंदवाडी ' मध्ये प्रभावीपणे रंगविली आहे. मुलीला जशी बाहुली त्याच प्रमाणे मुलांना क्रिकेटची बॅट फार प्यार असते. रामची लकी बॅट त्याला नेहमीच यश मिळवून देते. त्यामुळे राम शाळेत सर्वांचा आवडता असतो. इतकेच नव्हे तर तो क्रिकेट टीमचा कर्णधार होतो. त्यामुळे त्याचा जिवलग मित्र त्याचा द्वेष करू लागतो ऐनवेळी त्याची लकी बॅट चोरीला जाते व त्यातून कथानक फुलत जाते. परंतु शेवटी अनेक संघर्षांना तोंड देऊन राम विजयी होतो व शाळेला अजिंक्यपद मिळवून देतो. श्री. कुपेरकरांनी हे सारे कथानक अत्यंत चटकदारपणे निवेदन केले असून ' क्रिकेट ' सारख्या आवडत्या खेळाविषयीची ही कथा वाचताना बालवाचक अगदी गुंग होतील. इतकेच नव्हे तर आपल्यालाही अशी एक ' लकी बॅट ' मिळावी असे त्यांना वाटू लागेल.

डॉ. सौ. चारुशीला गुप्ते
संयोजिका

म. सं. स. ग्रं., वाचनालय आवृत्ती.

वाचक क्रमांक ए ४४.

दि. २०/१२/२००२ दिनांक २५/१/०८

विषय ..वा.वी. क्र.....

१ : आभाळ फाटलं !

" राम, ए ऽ राम--" सुमतीबाई आपल्या रामला हाका मारीत होत्या-" कुठे गेलाय कुणास ठाऊक ! "--त्या मनातल्या मनात पुटपुटल्या. त्यांनी खोलीच्या बाहेर येऊन गॅलरीतून खाली पाहिले.

चाळीच्या बाजूलाच असलेल्या आराम हॉटेलजवळ एक घोळका जमा झालेला दिसला. त्या घोळक्यातच राम उभा होता. आजुबाजूला त्याचे बिलकुल लक्ष नव्हते. कानात जीव आणून तो रेडिओव ील क्रिकेटचे धावते समालोचन ऐकत होता, त्यामुळे त्याला साऱ्या गोष्टींचा विसर पडला होता.

" राम ऽ अरे-राऽऽम ! " सुमतीबाईंनी रामला त्या घोळक्यात पाहून पुन्हा एकदा मोठ्याने त्याला हाका मारल्या.

त्या हाका ऐकून शेजारीच उभ्या असलेल्या एका माणसाने रामला आपल्या हाताच्या कोपराने ढोमसले. त्याबरोबर तो एकदम भानावर आला आणि त्याला आई हाका मारीत असल्याचे ऐकू आले--

" राऽम, अरे ए ऽ राऽऽम--"

"आलो ग आई s——" असे म्हणून राम त्या घोळक्यातून बाहेर येऊन धावतच जिना चढून घरी आला. कॉमेंटरी पूर्णपणे ऐकायला मिळाली नाही म्हणून त्याचा थोड्यासा विरसच झाला म्हणायचा ! जराशा नाराजीनेच त्याने विचारले.

"काय ग आई?"

"अरे, तुला परीक्षेला नाही का जायचं ? वेळ बघ किती झालाय ?" सुमतीबाई काहीशा रागावून म्हणाल्या.

इतक्यात 'टण्, टण्, टण्——' भितीवरील घड्याळाचे अकरा ठोके पडले. त्याबरोबर राम चमकला.

"अरेच्या–अकरा वाजले की !" असे म्हणून त्याने झटपट आपले हात, पाय, तोंड धुतले. भराभर जेऊन घेतले. शाळेचा गणवेश करून त्याने पेन, पेन्सिल वगैरे वस्तू बरोबर आहेत की नाहीत ते नीटपणे पाहिले. नंतर आईला व देवाला नमस्कार करून 'जातो ग आई' असे म्हणून धडाधड जिना उतरून तो शाळेत निघाला.

राम दृष्टीआड होईपर्यंत सुमतीबाई एकटकपणे तो गेला त्या दिशेकडे पाहत होत्या. नंतर घरात येऊन देवापुढे हात जोडून त्या म्हणाल्या.

"देवा, बाबा तुलाच रे माझ्या रामची काळजी ! त्याला सुखात ठेव. बस ! दुसरं काही नको. तूच कर्ता करविता."

सुमतीबाई रामच्या बाबतीत पुष्कळ हळव्या होत्या.

रामची वार्षिक परीक्षा चालू होती. तो सातवीत होता आज त्याचा शेवटचा पेपर ! कॉमेन्टरी ऐकण्याच्या नादात त्याला

थोडासा उशीर झाला होता. धावत-पळतच तो परीक्षाहॉलमध्ये आपल्या जाग्यावर जाऊन वसला.

राम हा सुमतीबाई व गणपतराव नाईकांचा एकुलता एक मुलगा होता. त्यामुळे ते त्याचे खूपच लाड करीत. बालपणा-पासूनच म्हणजे समजायला लागल्यापासून रामला क्रिकेटचे वेड होते. म्हणून त्याच्या वडिलांनी त्याला छानपैकी एक चेंडू आणि छोटीशी बॅटही आणून दिली होती. खेळायला सोबत कोणी नसेल तर तो टप्प्याटप्प्याने चेंडूने खेळत बसे. कोणी जर क्रिकेट खेळत असला तर राम वेड्यासारखा टक लावून तिकडेच पहात बसा-यचा. तहानभूक साऱ्याचा त्याला विसर पडे. आई-वडिलांनाही रामच्या या वेडाचे कौतुकच वाटायचे. इतरांसारखे त्याचे गोट्या खेळणे, पतंग उडवणे वगैरे गोष्टींकडे अजिबात लक्ष जात नसे.

राम जात्याच हुशार होता. तो नियमितपणे अगदी मन लावून अभ्यास करी. शाळेत तो परीक्षेत नेहमी पहिल्या नंबराने पास व्हायचा. शाळेच्या खेळांच्या चढाओढीत राम नेमाने भाग घेई आणि या स्पर्धांमध्ये त्याला हमखास बक्षीस मिळे. पण खेळा-साठी त्याने अभ्यासाचा कंटाळा कधी केला नाही. फावल्या वेळात तो नेहमी खास खेळाच्या मैदानावर क्रिकेट खेळत असे. त्याची क्रिकेटची आवड पाहून त्याच्या वडिलांनी त्याला आपल्या ओळखीच्या एका क्रिकेट संघाचा सभासद बनविले होते. शाळेच्या शिक्षकांप्रमाणे ते देखील रामला खेळात मार्गदर्शन करीत. त्याला म्हणत,

" तुला रणजी व्हायचंय ना ? मग खेळताना नेहमी पुढे जा,

आणि खेळपट्टी कशीही असो, प्रत्येक चेंडूला चोपून काढ. उन्हा-पावसात खेळण्याचा नेहमी सराव कर. प्रकृती बळकट बनली पाहिजे–बरं का ! पण अभ्यासाकडे मात्र दुर्लक्ष करू नको हो––"

वडिलांच्या या प्रोत्साहनाने रामला आणखी उत्साह वाटे. हळूहळू तो आकर्षक फटकेबाजी आणि मध्यमगती गोलंदाजी करायला शिकला. क्षेत्ररक्षणही तो अप्रतिम करू लागला. फलंदाजानी मारलेले अवघड टोले तो सहज अडवी. विजेच्या चपळतेने तो धावे.

राम शरीराने किरकोळ दिसे. पण त्याचे शरीर अतिशय लवचिक होते. त्याची नजर घारीसारखी तीक्ष्ण व मनगटात बालवयातही अफाट ताकद होती. या सर्वांचा त्याला उपयोग होई. तो टोलेबाजी करून प्रतिपक्षीय गोलंदाजांचा धुव्वा उडवे. धावांचा डोंगर रचून विजयश्री आपल्या शाळेच्या संघाकडे खेचून आणीत असे. आपणही रणजित सिंहाप्रमाणे श्रेष्ठ क्रिकेटपटू व्हावे अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्याने रणजीत सिंहाबद्दल बरेच वाचले होते. शिक्षकांकडून, वडिलांकडून त्याच्याबद्दलच्या पुष्कळ गोष्टी त्याने ऐकल्या होत्या.

बालपणापासून क्रिकेटची आवड असलेला राम त्याच्या शाळेचा एक आधारस्तंभ बनला होता. शाळेला दोन तीन क्रिकेट सामने त्याने जिंकून दिले होते, त्यामुळे गुरुजींसकट सर्वच त्याच्यावर लोभ करीत. आपल्या गुणांनी तो सर्वांचा आवडता झाला होता. ज्या बॅटने उत्कृष्ट फलंदाजी करून त्याने शालेय सामने जिंकले त्या बॅटवर तो भलताच खूष होता. ती बॅट

असल्याखेरीज तो कुठच्याच क्रिकेटच्या सामन्यांत खेळत नसे. त्याला ती 'लकी बॅट' वाटायची. त्या बॅटवर त्याची श्रद्धा होती.

रामने लागोपाठ तीनही सामन्यांत शाळेला विजय मिळवून दिल्याने जानेवारीत झालेल्या शाळेच्या वार्षिक समारंभात त्याचा खास सत्कार करण्यात आला होता. त्यावेळी मुख्याध्यापकांनी रामचे कौतुक करून त्याची ती आवडती 'लकी बॅट' त्याला बक्षिस म्हणून भेट दिली होती.

रामच्या आईवडिलांना त्याच्या या पराक्रमाचे अन् त्याला बक्षिस मिळालेल्या त्या 'लकी बॅट' चे खूपच कौतुक वाटे. आईला तर 'आमचा राम आणि त्याची लकी बॅट' याशिवाय आलेल्या पाहुण्यांशी बोलायला दुसरा विषयच नसे. आपल्या 'लकी बॅट' प्रमाणेच रामला त्याची मावशीही जास्त आवडे.

त्याचीही गोदूमावशी कोकणातल्या 'आनंदवाडी' या गावात राहत होती. राम हा एकुलता एक भाचा असल्याने मावशीची त्याच्यावर पुष्कळ माया होती. तिला दुसरे कुणीही नातलग नव्हते. कोकणातून मावशी मुंबईला उन्हाळ्याच्या सुट्टीत कधी आली की येताना रामसाठी भरपूर आंबे, काजू, फणस घेऊन येई.

मावशी लांबून येताना दिसली रे दिसली की, हातात कोणतेही काम असो ते टाकून राम 'मावशी, मावशी--' अशा हाका मारीत मावशीकडे धाव घेई. मावशी आली की मग जणू काय दोघांचेच राज्य ! मावशींचे नि भाच्याचे ! आनंदवाडीच्या या मावशीने रामला आपला आपला लळा लावला होता. तीदेखील

सदान्‌कदा आपल्या लाडक्या भाच्याचे अन् त्याच्या 'लकीबँट 'चे कौतुक करीत बसे.

त्यामुळे साहजिकच आनंदवाडीच्या मुलांना व इतर गावकऱ्यांना मावशीचा भाचा 'राम आणि त्याची लकी बॅट' कुतूहलाचा विषय झाले होते. ते नेहमी रामला आनंदवाडीत एकदा तरी आणण्याचा मावशीला आग्रह करीत. होय नाही करता करता शेवटी मावशीने रामला आनंदवाडीस आणण्याचे कबूल केले होते. येत्या उन्हाळी सुट्टीत मावशी रामला कोकणात घेऊन जाणार होती. तसे तिने पत्राने आपल्या बहिणीला–सुमतीबाईंना कळविले होते. राम तर ते पत्र वाचून आनंदाने नाचला होता. आतापर्यंत तो एकदाही कोकणात मावशीकडे गेला नव्हता. त्याची वार्षिक परीक्षा संपताच दोन दिवसांत मावशी मुंबईला येणार होती.

परीक्षेचा पेपर चालू होता. रामने मन लावून सगळे प्रश्न सोडवले. शेवटच्या प्रश्नाचे उत्तर लिहून होताच त्याने 'हुश्श' करून सुटकेचा निःश्वास सोडला. "संपली बुवा एकदाची परीक्षा ! चला, आता एक महिना सुट्टी–" असे मनात म्हणत तो आपल्या जागेवरून उठला. सुपरवायझरच्या हातात उत्तरपत्रिका देऊन तो हॉलच्या बाहेर आला. बाजूलाच मुख्याध्यापकांचे कार्यालय होते. तो जाण्यापूर्वी प्रथम त्यांना जाऊन भेटला. मुख्याध्यापकांनी त्याला शुभेच्छा दिल्या. मग राम शाळेच्या बाहेर पडला आणि त्याला एकदम मावशीची आठवण आली.

क्रिकेटची कॉमेंट्री ऐकण्याच्या गुंगीत अन् शाळेत जाण्याच्या गडबडीत आईला, मावशीबद्दल विचारायचे तो विसरला होता. आता उद्यापरवा मावशी त्याला कोकणात नेण्यासाठी येणार होती.

मावशीच्या विचाराने राम धावत पळत घराच्या दिशेने निघाला. तो ज्या चाळीत राहात होता ती मोदी चाळ शाळेपासून बरीच दूर होती. रामला कोकणात मावशीकडे पाठवावे अशी सर्वांची इच्छा होती, परंतु निराळ्याच घटनेने ती पूर्ण होणार होती.

इकडे नशीबाने रामपुढे दुर्दैवाचे ताट वाढून ठेवले होते. तो आपल्या चाळजवळ पोहोचतो तो काय!



समोरचं दृश्य पाहून राम भीतीने काळवंडून गेला. त्याची ती जुनाट झालेली पाचमजली मोदी चाळ कोसळली होती. अग्नि-

शामक दलाचे जवान भराभर दगडविटांचा ढिगारा उपशीत होते. तेथे बरीच गर्दी झाली होती. जखमींना ताबडतोब हॉस्पिटलमध्ये हलविले जात होते. पण रामला त्याचे आईवडील दिसले नाहीत. तो हताश होऊन जागच्या जागी मटकन् बसला आणि ओक्साबोक्शी रडू लागला.

ही घटना कळताच रामच्या शाळेचे मुख्याध्यापक लगोलग अपघाताच्या ठिकाणी धावून आले. त्यांनी रडणाऱ्या रामचे कसे-बसे सांत्वन केले. त्याच्या मावशीला ताबडतोब तार केली.

त्याच्या आईवडिलांना ज्या हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते तेथे रामला मुख्याध्यापक घेऊन गेले. वडिलांनी केव्हाच जग सोडले होते. आई गंभीर जखमी झाली होती.

हॉस्पिटलमध्ये येताच रामने आईच्या खाटेकडे धाव घेतली. तिने 'बाळ-राम' अशी एक करुण हाक त्याला मारली. तिला शब्द उच्चारणे कठीण होत होते. तिच्याजवळ रामची ती 'लकी बॅट' होती. राम आईला मिठी मारून गद्गदून रडू लागला.

त्याच्या पाठीवर आपला थरथरता हात फिरवीत आई म्हणाली,

"रा ऽऽम, उ...उगी...रहा! ही...ही...तुझी...बॅट...त्या ...त्या... पडझडीत...मी ...मी... वाचवली...र... रडू...नकोस ...म...मावशी ...आ ...आहेच–" असे म्हणत रामला गोंजारीत आईने प्राण सोडला.

"आई–" रामने दोनच अक्षरे उच्चारली आणि आईच्या

शांत देहाजवळ बसून तिच्या पायावर आपले डोके घट्ट आवळून धरले. तो पुन्हा डोके वर उचलीना.

इतक्यात तेथे मावशी आली. एस. टी. त बसता बसताच तिला तार मिळाली होती. रामला स्पर्श करीत तिने म्हटले.

" राम–उठ बाळ ! मी आले आहे–घाबरू नकोस–एकदमच आभाळ कोसळलं त्याला काय करणार ! चल–उठ–"

आपले डोके वर उचलीत राम व्याकुळ होऊन म्हणाला.

" मावशी, असा कसा ग तो निष्ठुर देव ! माझे आईबाबा–दोघांनाही त्याने नेलं. "

" राम–बाळा, देवाचे हेतू आपणा पामरांना काय कळणार ! शांत हो पाहू. आपण लवकरच आता कोकणात जाऊ—" असे म्हणून मावशीने आपल्या भाच्याला जवळ घेऊन कुरवाळले.

दुसऱ्याच दिवशी सकाळी रामला कोकणात घेऊन जाण्याची मावशीने तयारी केली. त्याच्या शाळेच्या मुख्याध्यापकांना तिने रामचे प्रगतीपत्रक व शाळेचा दाखला आनंदवाडीला पाठवून देण्यास सांगितले.

✠ ✠ ✠

२ : आनंदवाडीत राम

एस. टी. तून येताना दिसलेल्या डोंगरांच्या लांबच लांब रांगा, वेगवेगळे घाट, काळेकुट्ट कातळ, वळणावळणाचे रस्ते, नारळी

पोफळीची झाडे, आमराया आणि मधूनच सूर्यनारायणाच्या सोनेरी किरणांनी चकाकणारे, गर्द झाडीतून डोकावणारे डोंगरमाथे हे सारे मनोहर दृश्य पाहून राम अगदी हरखून गेला होता.

खरे तर, कोकण म्हणजे निसर्ग सौंदर्याचा एक अमोल ठेवाच आहे या रमणीय निसर्गात एक प्रकारची माधुरी आहे. उंच उंच डोंगर माथ्यावरून खळखळत वाहणाऱ्या अवखळ नद्या अन् त्यातून जलक्रीडा करणारे जलचर, थव्याथव्याने उडणारे पक्षी जसे काही या निसर्गकन्येच्या अपूर्व सौंदर्यात मनसोक्त डुंबत असतात. कोंकणचे हे वैभवच सर्वांचे आकर्षण आहे !

अशा या सुंदर कोकणच्या पट्ट्यात एका डोंगराच्या कुशीत 'आनंदवाडी' हे गाव वसले होते. राम मावशीबरोबर या आनंदवाडीत आला होता. कोकणात येताच तो आपले दुःख थोडेसे विसरला. वाऱ्याच्या मंद झुळुकेने आपल्या पाठीवर जणू काय आईच्या मायेचा हळूवार हातच फिरतोय असे त्याला वाटू लागले. पक्ष्यांच्या मंजुळ किलबिलीने त्याचे मन अधिकच प्रसन्न झाले.

आनंदवाडीतील मावशीचे घर छोटेसे असूनदेखील अगदी टुमदार आणि खूपच सुरेख दिसे. मावशीच्या घरासमोरची बाग तर अतिशय सुंदर आणि गोड गोड वाटत होती. एकटी असूनही मावशीने बागेसाठी बरेच कष्ट घेतलेले दिसत होते. आंबा, पपई, पपनस, फणस, काजू, इत्यादी फळझाडे व झेंडू, चाफा, जास्वंदी आणि निरनिराळ्या गुलाबांच्या फुलांचे बागेतले ताटवे येणाऱ्या-जाणाऱ्यांचे मन ओढून घेत असत.

एखादा वाटसरू किंवा गावकरी मावशीच्या अंगणात थोडावेळ मुक्काम ठोकल्याखेरीज पुढे जात नसे. प्रत्येकजण माव-

शीची विचारपूस करी. कुणीतरी ओळखीचा गावकरी अंगणात शिरता शिरता मोठ्याने हाक मारी.

" गे ऽ–मावश्ये ऽऽ; हैस का घरा ऽऽ त–?"

ती हाक ऐकून मावशी हातातले काम टाकून लगबगीने बाहेर येई व आलेल्याचं स्वागत करून त्याला हसून म्हणे.

" या–बसा जरा पडवीत ! बऱ्याच दिवसांनी आलात–"

" अगे ऽ –आठव यीली नि आलो ऽ ! तू बरी आसस मा ? कणकवलीक चाललंय–तुजा काय काम आसा तं सांग–"

मग मावशी त्या गाववाल्याला आपले काहीतरी काम असेलच तर सांगे, आणि त्याच्या पुढ्यात आपल्या बागेतल्या फळांचा मेवा आणून ठेवी. त्या रुचकर मेव्याच्या गोडव्याने गाववाला अगदी खूष होई. मावशीबरोबर इकडच्या तिकडच्या थोड्या गप्पागोष्टी करी अन् मग तिचा निरोप घेऊन जाई.

गावातली मुले मावशीकडे धावत येत आणि ती छोटी मंडळी म्हणत,

" मा ऽवछी ऽऽ –आमी आ ऽलो ऽऽ––"

मग त्या छोट्यांचा आवाज ऐकून मावशी त्यांना घरातल्या फळांचा खाऊ बाहेर आणून देई. त्या मुलांना ती गोंजारी. कधी त्यांचे गालगुच्चे घेई. खाऊ मिळताच मुले आनंदाने बाहेर पळत जात.

रामची माबशी तिच्या चांगुलपणामुळे साऱ्या आनंदवाडीचीच मावशी झाली होती. पोराथोरापासून तो पाटील, शाळेच्या शिक्षकांपर्यंत सारेच जण तिचे गोडवे गात.

राम ज्या दिवशी आला त्याच दिवशी संध्याकाळी सारेजण मावशीच्या घराच्या पडवीत जमले. शेजारीपाजारी, माने गूरुजी व चंदू, पपू, बन्या, अंतू वगैरे मुले सारेंचजण तिथे होते. सगळे रामकडे कौतुकाने पहात होते. माने गुरुजी म्हणाले,

"काय-मावशी काय म्हणतात तुमचे भाचेराव ?"

"हा काय आमचा राम ! पण गुरुजी, आता आपण आमच्या-वर एक कृपा केली पाहिजे."

"अहो कृपा कसली ? काय सेवा करू सांगा-" माने गुरुजी म्हणाले.

मग मावशीने रामची सारी कहाणी त्यांना सांगितली. राम आता जगात एकटाच होता. त्यामुळे त्याला मावशीने आनंदवाडीत कायमचेच राहायला आणले होते. मावशी रामला आता इथेच शिक्षण देणार होत्या. त्याची सारी जबाबदारी त्यांच्यावर होती. पोरक्या रामवर लहानपणीच संकट ओढवलेले पाहून माने गुरुजी हळहळले. त्यांनी मावशीला म्हटले,

"मावशी, तुम्ही काही काळजी करू नका. आपल्या शाळेत आपण त्याचं नाव घालू. राम आता केवळ तुमचाच नाही, माझाही आहे बरं का !" असे म्हणत रामच्या पाठीवर हात फिरवीत माने गुरुजींनी मावशीचा नि त्याचा निरोप घेऊन निघून गेले.

आनंदवाडीच्या डोंगराच्या कुशीत 'आनंद विद्यालय' उभे आहे. बाजूलाच शाळेची एक गोड पाण्याची विहीर असून शाळे-भोवतीदेखील आंबे, काजू वगैरे सारखी झाडे अन् निरनिराळ्या सुगंधीत फुलांचे ताटवे आहेत. हे सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या हौसेने

केले आहे. त्यासाठी त्यांनी खूप श्रमदान केलंय. या गोड आणि रम्य वातावरणाच्या मोहाने गावात येणारा कोणीही नवीन मुलगा 'आनंद विद्यालया 'त प्रवेश करायला एका पायावर तयार होईल. या शाळेत तो रमून जाईल.

आनंद विद्यालयाला आपल्या कार्याबद्दल खूप अभिमान आहे आणि खरोखरीच अभिमान वाटावा अशी कामगिरी या शाळेने केलीय. विद्यालयाच्या प्रत्येक विद्यार्थ्याने विविध स्पर्धा गाजविल्या आहेत. खो खो, फुटबॉल, क्रिकेट, पोहणे वगैरे बहुतेक खेळांच्या आंतरशालेय स्पर्धा आनंद विद्यालयाने जिंकल्या आहेत. पण एका वर्षी मात्र या शाळेच्या पराक्रमाला गालबोट लागलंय. मागल्या वेळेस या शाळेला तालुक्याच्या 'मराठा विद्यामंदिर' या शाळेने क्रिकेटच्या सामन्यात हरविले होते. एवढी गोष्ट सोडता आनंद विद्यालय संबंध तालुक्यात नाव मिळवून आहे. या शाळेने 'पुढच्या वेळेस आम्ही सामना जिंकू' अशी उमेद बाळगलीय. या शाळेची शैक्षणिक परंपरादेखील मोठी उज्ज्वल आहे. आनंदवाडीमध्ये जन्माला आलेले प्रत्येक मूल या शाळेत सगळ्या इयत्ता धडाधड् पास होत मोठे होई. खेळातले सुयश अन् अभ्यासातली प्रगती यामुळे ही शाळा फारच प्रसिद्ध झाली. तोपर्यंत 'आनंदवाडी' हे गाव आणि या गावात 'आनंद विद्यालय' आहे याची मुळी तालुक्यातल्या कुणालाच कल्पना नव्हती; पण आता आजूबाजूच्या गावातली मुलेसुद्धा याच शाळेत शिकायला येतात. हळूहळू या शाळेचे नाव संबंध जिल्ह्यात झाले होते. शाळेचा सर्वत्र गवगवा झाला होता. त्यामुळे आनंदवाडी अगदी खूष होऊन गेली होती.

ही सारी किमया होती माने गुरुजींची. ते ज्यावेळी आनंद विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून आले त्यावेळेपर्यंत या शाळेचे नावसुद्धा कुणाला माहीत नव्हते. अगदी आनंदवाडीचे गावकरी-सुद्धा या शाळेत आपली मुले पाठवायला कधीच तयार नसत. पण माने गुरुजी या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून आले आणि जणू काय जादूची कांडीच फिरली ! माने गुरुजींनी शाळा सुधारण्याचा अगदी चंगच बांधला. त्यासाठी पुष्कळ धडपड केली. काही गोष्टी त्यांनी प्रयत्नपूर्वक शिकविल्या. शाळेला नुसते वेळापत्रक व केवळ करडी शिस्त असून चालत नाही; त्याप्रमाणे शिकवावे लागते, वागावे लागते ! मुलांपुढे आदर्श ठेवावा लागतो ! हे सर्व त्यांना पूर्णपणे पटले होते. माने गुरुजी म्हणजे आता आनंद विद्यालयाचे एक-प्रकारचे चैतन्यमय जीवनच झालंय !

आनंद विद्यालयात आल्या आल्या त्यांची मुलांशी पहिली मुला-खत झाली. त्यांनी मुलांची सभा घेतली. त्या पहिल्याच भेटीत ते म्हणाले,

" मुलांनो, आज आपण सारे सरस्वतीच्या मंदिरात आहोत. सरस्वती ही विद्येची देवता आहे. तिची आराधना आपण करायला हवी. पण एक लक्षात ठेवा—पूजा करणं म्हणजे देवाच्या मूर्तीसमोरची घंटा वाजविणं नव्हे की केवळ गंधफुले वाहणं नव्हे ! तुम्ही मनापासून अभ्यास केला पाहिजे. त्यासाठी खूप कष्ट करायला हवेत, तरच ती सरस्वती देवीची खरी पूजा होईल. तुम्ही कुणी-तरी मोठं व्हावं अशीच आम्हा वडीलमंडळींची मनापासून इच्छा असते. मुलांनो, मी आता तुमच्यातलाच एक आहे. तुम्हाला मदत करायला मला नेहमीच आनंद वाटेल. तुमचे आजचे वय अभ्या-

साचे आणि खेळण्याचे आहे. पण त्याबरोबरच तुम्ही आदर्श विद्यार्थी व्हा ! जयहिंद !"

माने गुरुजींचे हे भाषण संपले आणि टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. त्यांनी पहिल्याच भेटीत मुलांची, गावकऱ्यांची मने जिंकली. त्यावेळी ज्या दानशूर गोपाळशेटनी शाळा बांधण्याकरीता मोठी देणगी दिली होती त्यांनीच यावेळेस मुलांसाठी क्रीडांगण तयार करण्याचे आश्वासन माने गुरुजींना दिले. त्याप्रमाणे काही दिवसांतच क्रीडांगण बनवण्यात आले. त्याला 'आनंदी मैदान' असे नाव देण्यात आले. सर्वजण गोपाळशेटजींची वाहवा करू लागले.

तर असे हे माने गुरुजी ! लहानथोरांच्या–ज्याच्या त्याच्या तोंडी त्यांचेच नाव ! साधी राहणी नि उच्च विचारसरणी. साधारण चाळीस–पंचेचाळीस वय असेल त्यांचे. वेश खादीचाच– साधारण पंडित नेहरूंसारखाच व डोळ्यांवर चष्मा असायचा. त्यांच्या पत्नीचे नाव मालतीबाई होते. दोघांनाही मुले खूप आवडत. दोघेही स्वभावाने प्रेमळ ! त्यात त्यांना स्वत:ला मूल-बाळ असे कोणीही नव्हते. त्यामुळे साहजिकच पोरक्या रामवर ते पुष्कळ प्रेम करू लागले.

रामच्या प्रेमळ, गोड व नम्र स्वभावामुळे माने गुरुजींना त्याचे खूपच कौतुक वाटे. त्यांच्याकडे कितीतरी मुले यायची, जायची. कोणाला वाचायला पुस्तके देतील, कोणाला पोहायला शिकवतील, आणखी काही काही करतील. त्यांच्या खोलीत मोठमोठ्या भारतीय पुढाऱ्यांच्या, क्रांतिकारकांच्या तसबिरी होत्या. ही सारी माने गुरुजींची दैवते ! त्या त्या दैवतांचा वाढदिवस खोलीत साजरा होई. नवीन पिढी तयार करण्याचे व्रत माने गुरुजींनी

घेतले होते. थोर विचार घेणारी, व्यापक दृष्टी ठेवणारी नवी पिढी त्यांना घडवायची होती.

काही दिवसांनी मानेगुरुजी रामच्या मावशीकडे गेले. मुंबईच्या शाळेतून रामचे प्रगती पुस्तक, दाखला व खेळाबद्दलचें शाळेचे प्रशस्तीपत्रकही आले होते. राम पहिल्या नंबराने सातवी पास झाला होता. रामचे अभ्यासातलें यश आणि खेळातले प्राविण्य पाहून माने गुरुजींना आनंद झाला. ते म्हणाले,

" मावशी, हुशार आहे हो तुमचा राम ! आपल्या आनंद-वाडीला आता रामसारखा मुलगा लाभलाय—" असे म्हणत त्यांनी कौतुकाने रामची पाठ थोपटली. तेव्हा राम लाजला.

तेवढ्यात मावशी रामला म्हणाली,

" अरे, गुरुजींना तुझी ' लकी बॅट ' तरी दाखवशील की नाही ?"

" दाखवतो तर—" असे म्हणून राम आत आपल्या खोलीत गेला व आपली लकी बॅट आणून माने गुरुजींना दाखवली.

" अरे वा ! सुंदर आहे तुझी लकी बॅट–भाग्यवान दिसतेय ! पण आता बॅटचा उपयोग आपल्या आनंदवाडीच्या शाळेसाठी-सुद्धा करायचा हं. तुझं नाव आनंद विद्यालयात दाखल करायचंय. लौकरच शाळा सुरू होईल. बरं मावशी, येतो मी ! " असे बोलून मानेगुरुजी निघून गेले.

शाळा सुरू व्हायला थोडेच दिवस बाकी होते. रामला आनंद-वाडी खूपच आवडली. कंटाळा येई तेव्हा राम आनंदी नदीकाठी जाई. नदीकाठचा देखावा नयनरम्य असे. आजुबाजूला वृक्षा-

च्छादित टेकड्या होत्या. त्या जंगलात मोर होते, वानर होते. राम कधी कधी एकटाच वनराईत जाई. त्या वातावरणात त्याला आपल्या आईची माया आठवे. मग तो मुग्ध होऊन जाई.

३ : आनंद विद्यालयात

शाळा सुरू होऊन सहा महिने उलटले. राम आनंदविद्यालयात नियमितपणे जाऊ लागला होता. आठवीच्या सहामाही परीक्षेत तो वर्गात पहिला आला . त्यामुळे शिक्षकांना व इतर मुलांचा त्याच्यावरचा विश्वास आणि आदर अधिकच वाढला. राम हुशार आहे हे आतापर्यंत त्यांना फक्त ऐकून माहीत होते. आता सर्वच त्याला मान देऊ लागले.

चंदू हा रामचा एक आवडता मित्र ! अभ्यासात हुशार. शाळेच्या परीक्षेत नेहमीच त्याचा पहिला नंबर असायचा; पण यावेळच्या सहामाही परीक्षेत मात्र तो नंबर रामने पटकावला होता, तेव्हा चंदूला रामचा थोडा मत्सर वाटला. चंदू ' आनंद विद्यालया ' च्या क्रिकेट संघाचा कर्णधारदेखील होता. शाळेच्या सर्व स्पर्धांमध्ये तोच पुढे असे. वृत्तीने तो संशयी असला तरी मनाने फारच चांगला होता. पण कानाने अगदी हलका असल्यामुळे कोणी कधी त्याचे कान फुंकले तर तो केव्हा काय करील

याचा नेमच नसे. त्याच्याशी मैत्री केल्यापासून रामला त्याचा हा स्वभाव चांगलाच माहीत झाला होता. त्यामुळे तो चंदूचा स्वभाव बदलण्याचा, त्याला चांगले वळण लावण्याचा प्रयत्न करीत असे. कारण चंदूला वाईट संगतीसुद्धा बऱ्याच होत्या. तेव्हा त्याच्या स्वभावामुळे तो बिघडण्याचाही संभव होता.

अगदी याच्या उलट रामचा दुसरा मित्र पपू उर्फ प्रदीप लोणे ! तोही रामच्या वर्गात शिकत होता. हा तर रामला खूपच जपत असे. पपू जरी अभ्यासात हुशार नसला तरी अगदीच 'ढ' किंवा 'बुद्दू' नव्हता. पण खेळण्यातच त्याचा अधिक वेळ जाई. शरीराने तो आडदांड असून वेळच पडली तर मारामारीसुद्धा करायचा. अभ्यासात जास्त लक्ष न घालता जेवढे शिकता येईल तेवढेच तो शिकत असे. गुरुजी वर्गात जेवढे काही शिकवीत तेवढेच तो डोके ताळ्यावर ठेवून लक्षात ठेवी. डोळे फाडफाडून जास्त अभ्यास करावा अन् वर्गात पहिला नंबर मिळवावा अशी काही त्याची महत्त्वाकांक्षा नव्हती. कधी कुणाचे बोलणे पटले नाही तर मात्र पपू फटकळपणे बोलत असे; पण तो घमेंडखोर नव्हता. तोही आनंद विद्यालयाच्या क्रिकेट संघाचा चौफेर टोलेबाजी करणारा भरंवशाचा फलंदाज होता. तसांच आपल्या वेगवान गोलंदाजीने तो मैदान दणाणन सोडी. त्याच्या या क्रीडानैपुण्यामुळेच शाळेतले सर्व शिक्षक व मुले त्याच्यावर प्रेम करीत.

तसेच बन्या आणि अंतू-आनंद विद्यालयाचे सलामीचे फलंदाज ! पण हे दोघेही शाळेतले टोळभैरव ! परीक्षेत कसेतरी अगदी काठावरच पास होत. बन्या व अंतूही वाह्यात मुले म्हणून ओळखली जात. बरोबरीची मुले नववीत गेली तरी हे अजून आठवीतच

होते. ते स्वतः जसे वागत तसेच दुसऱ्यांनी वागावे असे त्यांना वाटे, त्यांना दुसऱ्या कुणाचे चांगले झालेले बघवत नसे. चंदू, राम आणि पपू यांच्या घनिष्ट मैत्रीमुळे बन्या आणि अंतू त्यांचा द्वेष करू लागले; पण ते बाहेरून तसे दाखवीत नसत. विशेष म्हणजे त्यांना रामचाच खूप राग येऊ लागला.

पण राम मात्र सगळ्यांशी चांगुलपणाने वागे. मिळून मिसळून राही. कधी कुणाशी भांडण होण्याचा प्रसंग आलाच तर स्वतःकडे कमीपणा घेऊन तो माघार घेई. दुसऱ्याला तो चुकूनही कधी दुखवीत नसे, कारण मूळातच त्याचा स्वभाव तसा होता. पण एक दिवस असे काही घडले की रामला स्वतःच्या मनाविरुद्ध वागावे लागले.

काही दिवसांनंतरची गोष्ट. शनिवारचा दिवस. नेहमीप्रमाणे राम लवकर शाळेत चालला होता. बन्या आणि अंतूला त्याची ही वेळ माहीत होती. ते त्याच्या मागोमाग येत होते. त्यांनी त्याला हाक मारली,

" ए ऽ राम्या ऽऽ–"

रामने बन्या अंतूचा आवाज ऐकला; पण त्यांनी सरळ हाक मारली नाही म्हणून त्याने मागेही वळून पाहिले नाही. तेव्हा ते पुन्हा जोरजोराने त्याला हाका मारू लागले––

" ए ऽ राम्या ऽऽ–अरे–रामड्या ऽ रे ऽऽ–"

त्या हाका पुन्हा ऐकून मात्र रामला थोडासा राग आला. तो जवळच असलेल्या वडाच्या झाडाखाली थबकला. त्या झाडावर खूपच पारंब्या होत्या.

बन्याअंतू जवळ येताच रामने त्यांना जरा रागातच विचारले,

" काय रे–सरळ नावाने तुम्हाला हाका मारता येत नाहीत ?"

तेव्हा अंतू रागाने म्हणाला, " अरे फूट–मोठा आलाय दीड शहाणा ! तू कोण आम्हाला सांगणार ? आम्ही वाटेल तसं बोलू. एकच लाफा ठेवून दिला तर कुठच्या कुठे उडत जाशील–"

" एऽहेऽऽ–भित्र्या राम्या आम्हाला घाबरला ऽ –" बन्या म्हणाला.

" छट् ! –मी कशाला तुम्हाला घाबरेन ! तुम्हाला एकेकाला सहज पुरा पडेन मी–"

राम असे म्हणताच बन्या गुरगुरला–

" अरे सोड ! –मी एकटाच तुला सहज लोळवीन ! "

" मग लोळव ना ! नुसती वटवट कशाला करतोस ?"–रामने बन्याला आव्हान दिले.

" सोडीन की काय ?–मग बाकी रडू नकोस. "

" मी काही रडतराऊ नाहीय ! तूच शेपूट घालून पळत सुटशील. चला–आता होऊनच जाऊ दचा एकदा–"

" फारच हुशारी करतोय–दाखवू का माझा इंगा ?"

" दाखव ! दाखव ! "

क्षणार्धात दोघांनी आपली दप्तरे झाडाखाली फेकली. अंतू एका बाजूला उभा राहिला. बन्या आणि रामचे खांदे परस्परांना भिडले. सारी ताकद एकवटून ते एकमेंकांना ढकलू लागले. मग ते एकदम बाजूला झाले. थोडा वेळ गोल गोल फिरल्यानंतर त्यांची कुस्ती जुंपली. धुळीत त्यांची लोळवालोळवी सुरू झाली.

दोघेही एकमेकांवर गुद्दे चढवीत होते. जाड्या बन्याने संधी साधून रामला आपल्या कैचीत पकडून धुळीत लोळवले व त्याला घट्ट धरून ठेवले. पण राम किरकोळ–बारीक दिसत असला तरी शरीराने लवचिक आणि चपळ असल्याने त्याने ताबडतोब बन्याच्या कैचीतून आपली सुटका करुन घेतली आणि आपल्या पायांची विशिष्ट पकड घालून त्याने जाड्या बन्याला उताणे पाडले अन् त्याच्या छातीवर स्वार होऊन तो जोरजोराने गुद्दे चढवू लागला. त्यामुळे बन्या हैराण झाला. रामला आपल्या पायात अडकविण्याचा प्रयत्न करून तो म्हणाला,

" सोड–सोड मला ! "

राम म्हणाला,

" हरलो म्हण–चांगले वागशील तरच सोडीन. "

बन्याने सुटण्याची पुष्कळ धडपड केली, रामला चावे घेतले. तरीही राम त्याला बुकलीतच होता. तो आता बन्याला पुरा नरम करणार असे पाहताच एका बाजूला उभा असलेला अंतू पुढे सरसावला. त्याने रामला आपल्या हाताची पकड घालून बन्याच्या छातीवरून मागे खेचले आणि मागच्यामागे जमिनीवर आडवे केले. बन्या झटकन् आपले अंग सावरून उभा राहिला. मग त्या दोघांनी मिळून जमिनीवर पडलेल्या रामला मारायला सुरुवात केली. त्या दोघांच्या हल्ल्याने राम खूपच चिडला. तो चपळाईने निसटला नि त्यांना " भित्रे–भेकड " असे रागाने म्हणत स्वतःच्या बचावाकरिता त्याने उडी मारून वडाची एक पारंबी पकडली व तिला लोंबकळू लागला.

ते दोघे पुन्हा धावून येताच राम पारंबीला झोके घेत आपल्या चपळ पायांचा प्रसाद बन्याअंतूला देऊ लागला. तेवढ्यात शाळेतली काही मुले जवळ येऊ लागली. त्यांच्यात पपूही होता.

बन्याअंतू मिळून रामला मारताहेत असे पपूने पाहिले मात्र, तो धावतच रामच्या रोखाने आला. त्याच्या मागोमाग इतरही मुले पळत आली. त्या सर्वांनी मिळून बन्याअंतूला ठोकून काढले, आणि त्यांच्या तावडीतून रामची सुटका केली. 'आता बाकी आपली

चांगलीच फजिती होईल ' असे पाहताच बन्याअंतूनी आपली दफ्तरे घेऊन शाळेकडे धूम ठोकली.

मग रामने त्या सर्वांना घडलेला प्रकार सांगितला. ते सारे ऐकल्यावर पपू म्हणाला,

" आपण गुरुजींकडे बन्याअंतूची तक्रार करू या. फारच माजलेत ते ! गुरुजी त्यांना अगदी कडक शिक्षा करतील.."

" नको पपू–तक्रार केल्याने विशेष काही होणार नाही. तुम्ही येण्याअगोदर मी दोघांनाही खूपच चोपलंय. त्यात आणखी तुम्हीही त्यांना मारलंत. मला वाटते त्यांना एवढीच शिक्षा पुरे होईल. " राम म्हणाला.

आणि खरोखरच बन्याअंतूला बराच मार पडला होता. त्यामुळे रामचे म्हणणे मान्य होऊन सर्वजण शाळेत गेले.

वर्ग चालू होता. गुरुजी एक नवीन धडा शिकवीत होते. राम तल्लीन होऊन ऐकत होता. झालेल्या फजितीने ते मनातून जळफळत होते. रामचा आता कसा बदला घ्यावा याचाच ते विचार करू लागले.

शनिवारचा अर्धा दिवस असल्याने शाळा लवकर सुटणार होती. इतक्यात शाळेचा शिपाई एक सूचनावही घेऊन आला. गुरुजींनी मुलांना ती सूचना वाचून दाखविली––

" तालुक्याच्या ' मराठा विद्यामंदिर ' या शाळेचे क्रिकेटच्या सामन्यात भाग घेण्याकरिता आमंत्रण आले आहे. त्याकरिता आपल्या शाळेचा नवीन क्रिकेटसंघ निवडण्यात येणार आहे. तरी

ज्या विद्यार्थ्यांना यात भाग घेण्याची इच्छा असेल त्यांनी आज संध्याकाळी ठीक पाच वाजता आनंदी मैदानावर हजर व्हावे."

सूचना वाचून होताच ती वही घेऊन शिपाई निघून गेला. क्रिकेटचे वेड असलेल्या मुलांनी या सामन्यात भाग घ्यायचे ठरविले. रामनेही आपल्याबरोबर खेळावे असे त्यांना वाटत होते. शाळा सुटताच सर्व मुले घाईघाईने आपापल्या घरी गेली. त्यांना संध्याकाळी आनंदी मैदानावर हजर व्हायचे होते.

✠ ✠ ✠

४ : क्रिकेटसंघाची निवड

सायंकाळी बरोबर पाच वाजता सारे छोटे वीर आनंदी मैदानावर जमले. क्रिकेट सामन्यात भाग घ्यायला मिळणार म्हणून जवळजवळ सर्वांच्याच अंगी उत्साह संचारला होता. त्यांच्या बडबडीने आनंदी मैदान अगदी गडबडून गेले.

राम आपली क्रिकेटची 'लकीबॅट' घेऊन क्रीडा समितीच्या बैठकीला आला होता.

मुख्याध्यापक व क्रीडाशिक्षक अजूनही आले नव्हते. एकंदर सुमारे वीस विद्यार्थी आनंदी मैदानावर हजर होते. सर्वजण उत्सुकतेने रामची लकी बॅट पहात होते. आणि रामही आपल्या लकी बॅटचा पराक्रम सर्वांना रंगवून रंगवून सांगत होता–'त्या बॅटमुळे

त्याने मुंबईतले शालेय सामने कसे कसे जिंकले. मग ही लकी बॅट कशी काय मिळाली–वगैरे वगैरे–' सगळ्यांना रामचे आणि त्याच्या त्या लकी बॅटचे कौतुक वाटत होते. काहीजणांना तर त्याचा असूयाही वाटत होती. बन्याअंतू तर आता त्याचा खूप द्वेष करीत होते. तेही क्रिकेटच्या संघात यावेळी देखील प्रवेश मिळावा म्हणून मैदानावर हजर होते. शाळेचा माजी कर्णधार चंदूची सुद्धा आपल्या शाळेच्या संघातून रामने खेळावे अशी इच्छा नव्हती.

पण त्या ' लकी बॅट ' च्या पराक्रमाच्या वर्णनामुळे सर्वांचाच रामवर गाढ विश्वास बसला. त्या साऱ्यांचे एकमत झाले कि त्यांना मनापासून वाटू लागले की, ' यावेळी आपल्या शाळेच्या क्रिकेट संघाचा कर्णधारही रामलाच करावे. ' ही सर्वांची इच्छा पपूने बोलून दाखविली आणि सगळ्यांनी पपूचे बोलणे मान्य केले; पण चंदूच्या चेहऱ्यावर नापसंतीच्या आठ्या उमटल्या. त्याला हे मान्य नव्हते आणि बन्याअंतूलासुद्धा !

तेवढ्यात कोणीतरी एकजण म्हणाला.

" याच्या लकी बॅटमुळे जर आपण सामना जिंकलो तर आपल्या शाळेला लागलेला धब्बा पुसला जाईल. "

एवढ्यात एकाने शंका काढली–

" अरे–पण कर्णधाराची निवड आपण कसे करणार ? "

" अरेच्चा–तेही खरंच की ! पण पाहूया तर–"

हे ऐकून मात्र चंदूला थोडे बरे वाटले.

आणखी कुणी काहीतरी बोलणार तेवढ्यात त्यांच्या चर्चा तेथेच थांबल्या. कारण मुख्याध्यापक माने गुरुजींबरोबर क्रीडा शिक्षक आणि क्रीडासमितीचे दोन सभासद येत होते. ते येताच सगळ्यांनी उभे राहून आपला आदर व्यक्त केला. त्यांना बसायला सांगून माने गुरुजी आपल्या खुर्चीवर जाऊन बसले.

क्रिकेटच्या नियमाप्रमाणे एकंदर अकरा खेळाडूंची निवड करायची होती. शिवाय दोन खेळाडू राखीव म्हणून जादा घ्यायचे होते अन् उपस्थित होते एकूण वीस विद्यार्थी. बैठकीला सुरुवात झाली.

शिक्षकांना सर्व विद्यार्थ्यांच्या क्रीडानैपुण्याबद्दल खात्री होतीच. त्याशिवाय इतर मुलांनी रामच्या लकी बॅटबद्दल आणि त्याच्या क्रीडाकौशल्याची माहिती गुरुजींना पुरविली. शिक्षकांना रामची ही माहिती अगोदरच कळली होती, पण ती मुलांनीसुद्धा कळविल्याने त्यांना अधिकच बरे वाटले.

आधी ठरल्याप्रमाणे सर्वांची क्रिकेट चांचणी न घेता बन्या, अंतू, चंदू, पपू, विलास, रवी, मंगेश, संदीप, सुशील असे शाळेच्या जुन्या संघातले नऊ खेळाडू निवडण्यात आले आणि नवीनपैकी राम व राजू, शिवाय महेश व किरण यांची राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. या नवीन संघाच्या निवडीमुळे सर्वांनाच आनंद झाला. ज्यांची निवड झाली नाही त्यांना वाईट वाटले; पण ते थोडेसेच ! त्यांनी शाळेच्या निवडलेल्या नवीन क्रिकेट संघाच्या खेळाडूंचे मनापासून अभिनंदन केले.

संघाच्या खेळाडूंची निवड होताच " आता कर्णधार कोण ?" हा प्रश्न सर्वांच्यासमोर उभा राहिला. संघाचे कर्णधारपद

कोणाला द्यावे हा खरोखरच एक फार मोठा पेच होता. कारण चढू गेल्या वर्षीचा कर्णधार असल्याने तोच आधी कर्णधारपदा-साठी हटून बसला होता.

आणि दुसरे म्हणजे–रामचाच सर्वत्र गवगवा झाला होता. त्याला बक्षिस मिळालेली लकी बॅट, मुंबईच्या शाळेत असताना त्या शाळेला त्याने जिंकून दिलेले क्रिकेटचे तीन सामने व त्या-करीता उत्कृष्ट क्रीडानैपुण्याबद्दल मुंबईच्या शाळेने त्याला दिलेले प्रशस्तीपत्रक–यामुळे सगळ्यांनाच रामविषयी आदर नि विश्वास वाटत होता. आणि म्हणून कर्णधारपद रामलाच द्यावे असे माने गुरुजींना अन् क्रीडाशिक्षकांना मनातून वाटत होते. त्यासाठी कर्णधारपदापासून चंदूला दूर ठेवण्याचे ठरले होते.

शेवटी माने गुरुजी चंदूला म्हणाले,

" हे बघ चंदू–यंदा तू विश्रांती घे. आपण यावेळी रामला कर्णधार बनवू. पाहू या तरी एकदा मुंबईच्या या रामचा खेळ ! "

पण चंदूला गुरुजींचे हे बोलणे मुळीच आवडले नाही. तो लगेच माने गुरुजींना म्हणाला,

" गेल्या वर्षी आपली शाळा क्रिकेट सामन्यात हरली त्याचा ठपका तुम्ही माझ्यावर ठेवता आहात. खेळातल्या इतरांच्या चुका मात्र तुम्ही पाहिल्या नाहीत, म्हणूनच माझं कर्णधारपद काढून घ्यायचा तुमचा विचार आहे–स्पष्टच सांगा ना तसं ! "

चंदू असे बोलताच माने गुरुजी एकदम चमकले. ते त्याला समजावीत म्हणाले.

" अरे, असं काहीच नाही ! तुलाच पुन्हा कर्णधार करता येईल. पण मी म्हणतो–आपण निदान यावर्षी रामचा खेळ

पाहायला काय हरकत आहे ? पाहू या तरी त्याची आणि त्याची लकी बॅटची करामत ! नाहीतर पुढच्या वेळेस आहेसच तू कर्णधार !"

हे ऐकून तर चंदू जास्तच भडकला. त्याने म्हटले,

"म्हणजे मला नीट खेळतादेखील येत नाही असंच तुमचं म्हणणं आहे ना ? माझ्या मुळंच आपली शाळा सामना हरली वाटतं !" बोलता बोलता चंदूचा आवाजही चढू लागला.

ते पाहून माने गुरुजी व इतर सर्वांनाच नवल वाटले. समजावून सांगूनसुद्धा चंदूसारखा मुलगा का चिडावा याचा ते विचार करू लागले; पण काही झाले तरी कर्णधारपद चंदूला देणे योग्य नव्हते. त्यामुळे पुन्हा एकदा गेल्या वर्षीचाच धोका पत्करावा लागला असता. सगळ्यांनाच विश्वास वाटत होता की, 'रामच कर्णधारपदाची जबाबदारी नीटपणे पार पाडू शकेल–तो खरोखरीच यश मिळवेल.'

अखेर क्रीडाशिक्षकांनी सुचविले की, उद्या सकाळी रामची आणि चंदूची क्रिकेट चाचणी घ्यावी. उगाच कुणावर अन्याय व्हायला नको. चाचणीत या दोघांपैकी जो सर्वोत्तम ठरेल त्यालाच कर्णधार बनवायचें, म्हणजे दोघांचेंही खेळातले कौशल्य पणाला लागून संघाला अष्टपैलू कर्णधार लाभेल.

माने गुरुजींनासुद्धा ही सूचना आवडली. ते बोलले,

"ठीक आहे. उद्या रविवारीच कर्णधाराची कसोटी लागेल. उद्या सकाळी नऊ वाजता दोघांतील चुरस पहायला मीदेखील येईन. इतर शिक्षकही येतील आणि आपल्या शाळेच्या क्रिकेट-

संघाच्या कर्णधार कोणाला करायचे याबद्दल आम्ही सर्व मिळून निर्णय घेऊ. उद्या सकाळीं बरोबर नऊ वाजता तुम्ही सर्वजण जागेवर हजर व्हा."

सगळ्यांनी हा तोडगा आनंदाने मान्य केला आणि सगळेजण आपापल्या घरी निघून गेले.

✠ ✠ ✠

५ : कर्णधारपदासाठी चुरस

चंदू घरी गेल्यापासून आनंदी मैदानावर घडलेल्या घटनेचाच जास्त विचार करीत होता. सकाळी कर्णधारपदासाठी चांचणी होणार होती. रात्री पुष्कळ उशीरापर्यंत त्याला झोपच लागली नाही. जवळ जवळ दोन-तीन वाजेपर्यंत तो जागाच होता. दुसऱ्या दिवशी सकाळी पावणेनऊ वाजता तो उठला. पुरेशी झोप न मिळाल्यामुळे त्याचे डोळे चुरचुरत होते. डोके सुन्न व जड झाले होतें.

मैदानावर सर्वांना नऊ वाजता बोलाविलेले होते. बराच उशीर झाला होता. चंदूने कसेबसे दात घासले. भराभर हात-पाय-तोंड धतले. त्याला आंघोळीला वेळच मिळाला नाही. त्याचा चेहरा अगदी आक्रसलेला दिसत होता. तो धावत धावत आनंदी मैदानावर गेला.

इकडे रामने मात्र सकाळीच लौकर उठून मैदानावर जाण्याची तयारी केली होती. तो खूपच आनंदात होता. पण त्याबरोबरच त्याला चंदूबद्दल थोडेसे वाईट वाटलेच ! आज दोघामध्ये कर्णधारपदासाठी चुरस होणार होती. चंदूला दुखविण्याची रामला बिलकुल इच्छा नव्हती. पण सर्वांच्या जबरदस्त इच्छेमुळे त्याला या चुरशीत भाग घेतलाच पाहिजे होता. त्याचा आपल्या ' लकी बॅट ' वर विश्वास होता. ' कोणत्याही परिस्थितीत चंदू माझ्यावर मात करू शकणार नाही. त्याच्यापेक्षा मीच चांगला खेळेन याची मला खात्री आहे. ' तो मनात म्हणाला.

त्याने मावशीला नमस्कार केला. मग क्रिकेटचा पांढराशुभ्र गणवेश करून आणि खांद्यावर आपली लकी बॅट ठेवून राम रुबाबात मैदानाच्या दिशेने चालू लागला.

त्याला वाटेत चंदूही भेटला, पण चंदूने त्याच्याकडे पाहिले न पाहिल्यासारखे केले. त्याचा तो तुटकपणा पाहून रामला पुष्कळ वाईट वाटले. त्याच्या मनात आले--' नको ते क्रिकेट आणि कर्णधारपद ! कशाला उगाच दुसऱ्याला आपण दुखवायचं ?'-- पण सर्वांच्या मतापुढे रामचे काहीच चालणार नव्हते. चांचणी होणारच होती आणि परिक्षेत अपयश मिळविणे रामला तर कधीच आवडत नसे.

राम आनंदी मैदानावर येताच सर्व मुलांनी ताबडतोब त्याला घेराव घातला आणि ते म्हणाले,

" नक्की तूच जिंकणार, याची आम्हाला खात्री आहे ! तुझ्यासारखं खेळातलं कौशल्य चंदू दाखवू शकणार नाही ! "

काही वेळातच माने गुरुजी, क्रीडाशिक्षक आणि इतर शिक्षक मैदानावर आले. मुलांनी स्टंम्प्स वगैरे ठोकून क्रिकेटचे पीच तयार केले होते. शाळेचा शिपाई शाळेतले चेंडू व बॅट घेऊन हजर होता.

माने गुरुजींनी क्रीडाशिक्षकांना सूचना करताच चांचणीला सुरवात झाली. प्रथम इतर मुलांच्या बॅटिंगची व बॉलिंगची चांचणी घेऊन झाली. त्या सर्वांचाच खेळ चांगला होता.

मग चंदूने बॅट हातात घेतली व तो ऐटीत स्टम्पजवळ उभा राहिला आणि राम बॉलिंग करू लागला.

चंदू जपून अगदी सुरेख फटकेबाजी करीत होता, पण रामच्या जागरूकतेमुळे त्याला एकही धाव काढता येत नव्हती. पुढच्याच येणाऱ्या रामच्या चेंडूवर चंदूने 'स्क्वेअर ड्राइव्ह' मारण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला. चेंडू त्याच्या बॅटला चाटून परत फिरला. रामने तो मागे येणारा चेंडू अडवला.

रामच्या षटकातला शेवटचा चेंडू बाकी होता. तो मागे वळला. धावत धावत त्याने चेंडू चंदूच्या बॅटच्या रोखाने फेकला. चेंडू ऑफकडून वळला अन् त्याचा चंदूच्या बॅटला नकळत स्पर्श झाला आणि तो चंदूच्या पायाला लागून स्टम्पवर गेला.

त्या बरोबर सारेजण एकसुरात ओरडले,

"चंद आऊट !"

"शाब्बास राम !"

त्या चेंडूने चंदूची पूरती तारांबळ उडाली. तो मुकाट्याने पीचवरून बाजूला झाला. रामने अवघ्या एका षटकात चमत्कार आऊट केले.



आता रामची बॅटिंग होती. चंदू बॉलिंग करणार होता. राम सगळ्यांच्या शुभेच्छा घेऊन पीचवर गेला. आपली 'लकी बॅट' कलती ठेवून तो सावधपणे उभा राहिला.

चंदू बॉलिंग करू लागला. रामने त्याला ताबडतोब आऊट केल्यामुळे तो प्रत्येक चेंडू रामच्या दिशेने चिडून फेकत होता.

चंदूचे वेगात येणारे पाचैही चेंडू रामने जोरात टोलवले.

यामुळे चंदू पुष्कळ चिडला. राम आता बाद होईल की नाही याबद्दल शंकाच होती. षटकाला अखेरचा चेंडू बाकी होता.

चंदू धावत आला आणि त्याने सारे बळ एकवटून चेंडू फेकला, आणि—

माने गुरुजी रागाने ओरडले,

"चंदू s"

राम कळवळून मटकन् खाली बसला होता. चंदूने फेकलेला चेंडू वेगाने रामच्या नाकावर जाऊन आदळला होता. त्याच्या नाकातून रक्त वाहत होते. गुरुजींनी धावत जाऊन प्रथम त्याच्या नाकाचे रक्त पुसून काढले. त्याच्या कपड्यांवरची धूळ झटकली. शिपायाने त्याची बॅट आपल्याकडे घेतली आणि नंतर ते त्याला घेऊन जवळच असलेल्या भावे डॉक्टरांकडे गेले. डॉक्टरांनी त्याला काळजीपूर्वक बॅण्डेज करून औषध दिले.

असा काही प्रकार चंदू करील याबद्दल गुरुजींना अगोदरच संशय वाटत होता. त्या झालेल्या प्रकारामुळे त्यांनी चंदूला खडसावले. एवढेच नव्हे, तर या वर्षी त्याला शाळेच्या संघातून क्रिकेट सामन्यात भाग घ्यायलासुद्धा मिळणार नाही असे सांगितले. शिवाय त्यांनी कर्णधार म्हणून रामची निवड करण्यात आल्याचे जाहीर केले. पण मग मात्र चंदूला समजावीत एका बाजूला घेऊन ते म्हणाले,

"हे बघ बाळ, खेळात कधी असं चिडून खेळायचं नसतं. अरे, हारजीत ही व्हायचीच ! पण म्हणून काही आपण हरलो? तर आपल्या मित्राशी वैर धरायचं नसतं ! तू शहाणा आहेस. पुढच्या

वेळेस तुला निश्चित खेळायला मिळेल; पण पुन्हा मात्र अशी चूक करू नकोस. ”

चंदूला असे सांगितल्यावर माने गुरुजी आणि इतर शिक्षक व मुले रामला त्याच्या घरी घेऊन गेले.

चंदू हिरमुसला होऊन तेथेच बसला. ते पाहून बन्या-अंतूही त्याच्याजवळ आले. त्याला रामच्याविरुद्ध भडकविण्याची एक चांगलीच संधी बन्या-अंतूला आयतीच चालून आली होती.

❖ ❖ ❖

६ : जखमी राम

बराच उशीर झाला तरी राम अजून घरी परत आला नव्हता. जेवायची वेळ झाली होती. मावशी नेहमीप्रमाणे रामची वाट पहात घराच्या ओटयावर बसली होती. इतक्यात तिला आपल्याच घराकडे येत असलेला एक घोळका दिसला. तिने उठून उभे राहून त्या दिशेकडे पाहिले. त्या घोळक्यात माने गुरुजी, दोन –तीन इतर शिक्षक व बरीचशी मुले तिला दिसली. पपूही दिसला. त्याच्याच आधाराने राम चालत होता. ते पाहून मावशीचे काळीज ‘ चर्रर्रं ’ झाले. तिचे मन भीतीने शंकाकुल होऊन ती बाहेर धावतच रामकडे गेली.

रामच्या नाकाला बॅण्डेज लावलेले होते, तिथे थोडेसे रक्त दिसत होते. मावशीने घाबरूनच रामला विचारले,

“ राम– काय झालं बाळ ? ”

"अहो मावशी– घाबरण्याचं काहीच कारण नाही. त्याच्या नाकाला जरासं लागलंय. तो लौकर बरा होईल आणि आम्ही आहोतच–" माने गुरुजी मावशीला धीर देत म्हणाले. गुरुजींचे ते बोलणे ऐकून मावशीच्या थोडा जीवात जीव आला.

तिने रामच्या हाताला धरून त्याला आत आणले. त्यांच्या मागो माग सर्वजण आले नि मावशीने अंथरलेल्या सतरंजीवर बसले. मग माने गुरुजींनी मावशीला घडलेला सर्वप्रकार सांगितला अन् 'खेळात असं व्हायचंच' असे म्हणून तिची समजूत घातली.

नंतर ते रामकडे वळून म्हणाले,

"राम, बाळ तुला बरं वाटेपर्यंत तू शाळेत आला नाहीस तरी चालेल. आणि काळजी करू नकोस–कर्णधार तूच होणार आहेस!"

"तसं नाही गुरुजी, पण–" राम चाचरत म्हणाला.

"पण काय ?" माने गुरुजींनी विचारले.

"गुरुजी – रागावू नका ! पण चंदूलाच आपल्या शाळेच्या संघाचा कर्णधार करा. मला नको कर्णधारपद !" राम म्हणाला.

तशाही परिस्थितीत रामचे ते बोलणे ऐकून माने गुरुजी आनंदाने गहिवरले. त्याच्या पाठीवर थोपटून ते म्हणाले,

"तू वाईट वाटून घेऊ नकोस. खरोखरीच तू एक फार चांगला मुलगा आहेस ! म्हणूनच नेहमी तुला दुसऱ्यांचं भलं व्हावं असं वाटतं; पण चंदूच्या बेशिस्तीबद्दल त्याला शिक्षाही झालीच पाहिजे. तेव्हा माझी तुला आता आज्ञाच समज की, तूच शाळेच्या क्रिकेट संघाचा कर्णधार बनलं पाहिजेस. शिवाय चाचणीने ते सिद्ध केलंच आहे आणि गुरुची आज्ञा शिष्यानं पाळली पाहिजे –होय ना ?"

"होय गुरुजी !" असे म्हणून राम गप्प बसला. गुरुजींचा शब्द मोडणे तर त्याला शक्यच नव्हते; पण त्यामुळे त्याला चंदू-बद्दल अधिकच वाईट वाटले. थोडयावेळाने मानेगुरुजी मावशीला रामवर लक्ष ठेवायला सांगून निघून गेले. इतरांनीही त्याचा निरोप घेतला. फक्त पपू तेवढा रामच्या घरी थांबला.

मावशीने आपल्या लाडक्या भाच्याला मायेने कुरवाळले. राम मुकाटपणे तिच्या कुशीत पडून राहिला. काही वेळाने मावशी पपूला रामजवळ बसवून आत गेली आणि तिने त्यांना थोडंसं खायला आणून दिलं. मग पुन्हा ती आपलं काम उरकण्यासाठी आत निघून गेली.

पपू चंदूवर खूपच चिडला होता. त्याला चंदूचा स्वभाव पूर्ण-पणे माहीत होता. त्याच्याबद्दलचा आपला राग त्याने रामजवळ प्रकट केला--

"राम, त्या चंदूने चेंडू असा टाकता कामा नये होता. मला माहीत आहे–त्याने मुद्दाम तो रागानेच तसा फेकलाय ! तू काही म्हण राम–पण मी चंदूला आता चांगलाच ठोकणार आहे. असा राग आलाय म्हणून सांगू त्याचा–"

"नाही पपू–असं बाकी तू काही करू नकोस. अरे, खेळात मार लागणारच ! आतासुद्धा गुरुजी तसे म्हणाले नाहीत का ?–" राम पपूला समजावणीच्या सुरात म्हणाला.

"पण तू चंदूला नीट ओळखलंच नाहीसत राम ! मी मात्र त्याची कणीक तिंवणार. स्वत:ला कर्णधारपद मिळत नाही त्याचा राग त्याने दुसऱ्यावर का काढावा ?"

" हे बघ पपू–ते जाऊ दे ! मला आधी वचन दे चंदूला मारणार नाहीस म्हणून–"

" पण राम–त्याला असाच सोडला तर तो पुढेही त्रास देईल तुला !"

" अरे–पण त्याला दुसऱ्या कुणीतरी बिथरवलं असेल ! चंदू काही इतका दुष्ट नाही–"

" ते काही असो ! त्याला मी एकदातरी दिल्ली दाखवणारच !–"

" ठीक आहे–मग आजपासून आपली कट्टी ! तू आता बोलायचं नाहीस माझ्याशी. बघ–अजून विचार कर–"

रामचे हे बोलणे ऐकताच पपू ताबडतोब विचारात पडला.

" कबूल बुवा ! यावेळी तू सांगतोस म्हणूनच चंदूला माफ; पण पुढच्यावेळेस मात्र मी तुझं काही ऐकणार नाही हं !–" पपूने नाईलाजाने मान्य केले.

राम ते ऐकून खूष झाला. त्याने आनंदाने पपूचे हात दाबले अन् तो म्हणाला.

" पपू, तू खूप चांगला आहेस बघ !"

मग पपू त्याचा निरोप घेऊन निघून गेला.

चार–पाच दिवस रामने पूर्ण विश्रांती घेतली. मावशी त्याला बाहेरच पडू देत नव्हती. त्याचे सुजलेले नाक ती गरम पाण्याने शेकून काढी. डॉक्टरांनी दिलेले औषध आणि लेप वेळेवर देई. दोनतीनदा मानेगुरुजीदेखील त्याच्या तब्येतीची चौकशी करून

गेले. इतर मुलेही त्याला बघून जायची. पपू तर तिथे नेहमीच असायचा.

लौकरच क्रिकेटच्या सरावाला सुरुवात होणार होती. क्रीडा शिक्षक येऊन गेले तेव्हा त्यांनी रामला याची कल्पना दिली.

लौकरच राम बरा झाला. 'आता शाळेत जायला मिळेल, क्रिकेटच्या सरावाला हजर राहता येईल.' म्हणून त्याला एक नवा हुरूप चढला. 'उद्यापासून आपण शाळेत जाणार' असे त्याने मावशीला सांगूनही ठेवले.

✠ ✠ ✠

७ : त्रिमूर्तींचा गुप्त कट

मावशीने रामला सकाळीच उठवले. त्याची तब्येत बरीच सुधारली होती. त्याला आज शाळेत जायचे होते. मावशीला रामचं नेहमीच कौतुक वाटे. त्याला शाळा, खेळ याखेरीज जराही चैन पडत नव्हतं. शिवाय आजपासून क्रिकेटच्या सरावाला सुरुवात होणार होती. तो नव्हता म्हणून सरावही बंद होता.

रामने आंघोळ वगैरे करून न्याहारी केली. मग त्याने शाळेचा गणवेश केला. दप्तर घेतले आणि आपली 'लकी बॅट' खांद्यावर घेऊन तो रुबाबात शाळेच्या दिशेने चालू लागला.

शाळा सुरू व्हायला अजून अवकाश होता. चंदूची त्रिमूर्ती शाळेजवळ उभी होती. चंदू, बन्या आणि अंतू यांची सध्या त्रिमूर्ती बनली होती.

राम व चंदू या दोघांमध्ये कायमचे वितुष्ट यावे म्हणून बन्या व अंतू एक कुटील डाव टाकीत होते. त्यांच्या प्रयत्नांना यशही येत होते. कर्णधार प्रकरणामुळे चंदू रामशी बोलायचाच बंद झाला होता. शिवाय रामला चेंडूने मार लागल्याबद्दल गुरुजींनी चंदूला शिक्षा केली होती. त्याला संघातसुद्धा घेतले नव्हते. त्यामुळे तर तो रामचा अधिकच द्वेष करू लागला. तेव्हा त्या दोघांमध्ये वैर निर्माण करण्याची संधी बन्या-अंतूला आयतीच मिळाली. त्यांनी वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याचे ठरविले. मागे त्यांची रामकडून झालेली फजिती ते विसरले नव्हते.

ते चंदूजवळ मीठमसाला लावून रामची कागाळी करू लागले. रामला स्वार्थी ठरवून चंदूची स्तुती करू लागले. ते त्याला हरभऱ्याच्या झाडावर चढवीत. त्यामुळे चंदू एकदम हुरळून जाई. दोनतीन दिवसातच बन्या-अंतू चंदूचे खास मित्र बनले होते. चंदू त्यांच्या गळ्यात गळा घालून फिरू लागला. आता तर बन्या-अंतूचे चांगलेच फावले.

बिचाऱ्या चंदूला काय कल्पना की, रामबरोबरचे आपले संबंध बिघडावेत अशीच बन्या-अंतूची इच्छा आहे म्हणून ! चंदूचा राग फक्त त्याला कर्णधारपद न मिळाल्यानेच निर्माण झाला होता. पण तो हळूहळू रामचा द्वेष करू लागला होता.

" अरे, तो राम–तुझा प्रतिस्पर्धी ! त्यानेच तर शाळेच्या संघाचं तुझं कर्णधारपद काढून घेतलं आणि त्याला तू एवढ्यातच विसरलास ? अरे, त्याचा तू उलट वचपा काढला पाहिजेस–" अंतूने म्हटले.

" अरे–तो काळा साप आहे साप ! त्यानेच तर मुख्याध्यापकांना

सांगून तुला कर्णधारपदावरून काढायला लावलं नि आता स्वतःच शाळेच्या संघाचा कर्णधार बनलाय–" बन्या चंदूला चेतविण्यासाठी म्हणाला.

पण चंदूला बन्याचे बोलणे पटले नाही.

" पण बन्या, तुम्ही काय म्हणताय तेच अजून माझ्या लक्षात येत नाहीय. माझं नाव क्रिकेट संघातून काढण्याचं रामला कारणच काय मुळी ?"

" अरे, राम काय वाटेल ते करू शकतो. तो आपल्या गावात आल्यापासून सगळ्यांनीच त्याला डोक्यावर चढवलंय. काय त्याचं आणि त्याच्या लकी बॅटचं एवढं कौतुक करतात, कोण जाणे ! हुँ ऽ –! जणू काय रणजितसिंगच समजतात सगळे त्याला ! एकजात सगळे गुरुजी त्याचाच विचार घेतात. अरे–राम हुशार असला म्हणून काय आपल्या गुरुजींनी त्याचा सल्ला घ्यावा. चंदू, ते काही नाही–झाल्या अपमानावद्दल तू रामचा बदला घेतलाच पाहिजेस, नाहीतर आपली दोस्ती खतम् ! " बन्या निर्वाणीच्या सुरात बोलला.

" ठीक आहे–रामला आता मी चांगलाच धडा शिकवीन. " चंदूने प्रतिज्ञा केली.

त्याला भडकविण्याठी बन्या पुन्हा म्हणाला,

" नुसता धडा शिकवू नकोस–रामचा कर्णधाराचा रुबाब कुठच्या कुठे गेला पाहिजे ! त्याचा सारा अभिमान मातीत मिळाला पाहिजे ! "

" आपल्या माने गुरुजींचा तो पुष्कळ लाडका आहे ना ! मग रामला कर्णधार बनायला काय उशीर ?" अंतू म्हणाला.

" चंदू, तू एकाच बाबतीत रामपेक्षा कमी पडतोस ! " बन्या म्हणाला.

" कशात ?—" चंदूने बन्याला विचारले.

" तू गुरुजींची खुशामत करीत नाहीस. नेहमी त्यांच्या पुढेपुढे करीत नाहीस. जर तू कधी आपल्या माने गुरुजींचा बाजार आणून दिला असतास, त्यांना विहिरीचं गोड पाणी आणून दिलं असतं, त्यांची घरची सारी कामे केली असतीस तर गुरुजींनी तुझा राग केला नसता आणि मग तूच कर्णधार राहिला असतास. "

परंतु बन्याचे हे बोलणे न पटून चंदू म्हणाला,

" बन्या, तू अगदी मूर्ख आहेस ! राम मानेगुरुजींची सेवा करतो—खुशामत करीत नाही ! "

" अरे, आजकाल गुरुजींची सेवा करणं म्हणजेच त्यांची खुशामत करणं ! "

" पण निःस्वार्थपणे काम केलं तर ती सेवाच असते—"

" तेंच म्हणतो मी ! सेवा करण्यामागे जर स्वार्थ असला तर ती खुशामतच म्हटली पाहिजे, "

" हं—ते बरोबर आहे. " चंदूने कबूल केले.

" म्हणूनच मी म्हणतो—राम आपल्या गुरुजींची खुशामतच करतो. " बन्या म्हणाला.

" ती कशी काय ? "

" ह्यॅ s—कमालच आहे !

" अरे, तुझी लायकी असूनही राम कर्णधार नाही का बनला ? "

" हो ! "

" हो ऽ काय ? होयच मुळी ! म्हणूनच तू रामला आपला शत्रू समज. "

" बरोबर आहे तुमचं ! राम आता माझा शत्रूच–"

" नुसतं असं म्हणू नकोस. तो क्रिकेटच खेळणार नाही असं कर–"

" बघालच तुम्ही–मी काय करतोय ते ! " चंदू त्वेषाने म्हणाला.

इतक्यात—

" घण् ऽ घण् ऽऽ–" शाळा भरल्याची घंटा झाली. सर्व मुले भराभर आपापल्या वर्गात गेली. बन्या, अंतू अन् चंदूही वर्गात गेले. प्रार्थना व्हायला वेळ होता. पाठोपाठ राम आणि पपूही वर्गात शिरले. तेव्हा बन्या जरा हेटाळणीनेच रामला उद्देशून म्हणाला.

" या कर्णधारसाहेब, या ! कशी काय म्हणतेय तुमची तब्येत–"

" तुम्ही त्याला–वशिल्याच्या तट्टूला कर्णधारसाहेब म्हणणं हा माझा अपमान आहे बन्या–"

चंदूने असे म्हणताच रामला वाईट वाटले. तो त्याला म्हणाला,

" चंदू, असं वाकडेपणानं का बोलतोस तू ? "

त्यावर चंदू रागाने बोलला.

" तू कोण मला विचारणारा ? मी वाटेल ते बोलेन. ज्याचं मन काळं त्याला सगळं जग काळं दिसतं ! खरं बोलणं नेहमीच

कडू वाटतं–मानेगुरुजींचा तू खूषमस्कऱ्या आहेस. त्यांचा सांगकाम्या आहेस. म्हणूनच त्यांनी तुला कर्णधार बनवलंय. संघातून माझं नावसुद्धा काढलंय. ''

'' अरे पण चंदू, चांचणीतूनच माझी निवड झालीय ! मग यात वशिल्याचा प्रश्न काय ?''

'' तू काही सांगू नकोस ! माझे आता चांगलेच डोळे उघडलेत. मी तुला चांगला मित्र समजत होतो, पण तू स्वार्थी आहेस. चहाडखोर आहेस. ''

'' चंदू, असं बोलू नको–''

'' अरे, जा ! जा ! आलाय मोठा शहाणा ! ''

एवढ्यात प्रार्थनेला सुरुवात झाली. प्रार्थना झाल्यावर सर्वजण आपापल्या जागेवर बसले. चंदू, बन्या, अंतू एका बाकावर बसले तर रामच्या बाजूला पप्पू बसला होता. गुरुजी वर्गात आले. तास सुरू झाला.

वर्ग चालू होता. गुरुजी नवीन धडा शिकवीत होते.

क्रीडाशिक्षकांनी वर्गात येऊन दररोज शाळा सुटल्यावर क्रिकेटचा सराव होणार असल्याची मुलांना कल्पना दिली आणि रामला ऑफिसमध्ये बोलावून काही सूचना दिल्या.

शाळा सुटायला अजून एक तास होता. शिपाई सूचनावही घेऊन आला. सर्व मुले लक्षपूर्वक सूचना ऐकू लागली–

'' रविवारी सकाळी पोहोण्याच्या स्पर्धा होणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी शाळा सुटल्यावर आपली नावे ऑफिसमध्ये आणून द्यावीत. ''

सूचना वाचून होताच शिपाई निघून गेला.

ही सूचना ऐकताच बन्या अंतूचे डोळे लकाकले. त्यांच्यात एक गुप्त कट शिजला. त्यांनी चंदूला आपला बेत सांगितला. त्यानेसुद्धा ही संधी घेण्याचे ठरविले. राम या स्पर्धेत भाग घेणारच याबद्दल त्यांना खात्री होती.

शाळा सुटल्यावर चंदू निघून गेला. तो क्रिकेटचा सराव पाहायला थांबला नाही. बन्या, अंतू वगैरे आनंदी मैदानाकडे गेले.

दररोज वेळेवर क्रिकेटचा सराव होऊ लागला. संघाच्या खेळात दिवसेंदिवस प्रगती होत होती. राम कुशलतेने आपले खेळातले वर्चस्व जाणवून देत होता. सगळेजण त्याच्या सांघिक कौशल्याची आणि अष्टपैलू खेळाची वाहवा करू लागले. त्यामुळे आपली शाळा यावेळी क्रिकेटचा सामना जिंकेलच जिंकेल, याचा सर्वांना विश्वास वाटू लागला; पण त्रिमूर्ती मात्र रामच्या कौतुकाने सारखी मनातल्या मनात जळत होती. खरे म्हणजे बन्या–अंतूच एकेक नवीन बेत चंदूला सांगू लागले. रामचा सूड घेण्यासाठी त्याचे मन वळवू लागले.

शेवटी एकदाचा रविवार जवळ आला.

८ : नदीतले संकट

रविवार उजाडला. राम, पपू, चंदू, अंतू, किरण, महेश यांनी पोहोण्याच्या स्पर्धेसाठी आपले नाव नोंदवले होते. सर्वजण आनंदी-नदीजवळ जमले. शिक्षकांबरोबर इतर मुलेसुद्धा ही पोहण्याची स्पर्धा पाहण्यासाठी काठावर उभी होती.

नदी जेथे खडकावरून वाहात असे तेथे पाणी फार स्वच्छ दिसे. टेकडीपासून काही अंतरावर एका जागी पाण्याचा पृष्ठभाग गुळगुळीत आणि आरशासारखा चकचकीत दिसत असे. याच भागात पोहण्याची स्पर्धा घेण्याचे ठरले. या भागाच्या पुढे एका औदुंबराच्या झाडाजवळ येईपर्यंत नदी अगदी सुरक्षित होती; पण पुढे मात्र धोका होता. कारण त्यापलिकडे नदीचे पात्र एकदम निमुळते होऊन पाणी वेगाने खाली जात असे. मानेगुरुजींनी सर्वांना योग्य त्या सूचना दिल्या. मुलांना ठरलेल्या रेषेपर्यंतच पोहायला सांगितले. पुढच्या धोक्याची त्यांना कल्पना दिली. सर्व तयारी झाली.

एक-दोन-तीन !" क्रीडाशिक्षकांनी तीन शिट्ट्या वाजविल्या. तिसऱ्या शिट्टीला स्पर्धकांनी धाडकन् पाण्यात उड्या टाकल्या आणि पोहायला सुरुवात केली.

चंदू, व अंतू हे भराभर पाणी कापीत होते. त्यांच्यामागोमाग पपू होता. इतर मुलेही जवळजवळ पुढेच होती. पण राम त्यांच्या-

पेक्षा खूप मागे होता. आता बहुतेक राम हरणार असेच सर्वांना वाटू लागले तोच राम आपले कसब दाखवू लागला. माशाच्या चपळाईने तो सपासप पाणी कापू लागला. त्याने प्रथम पपूला ~~मागे टाकले. पपूलाही रामचे पोहणे पाहून~~ आनंद झाला. सुरुवातीलाच वेगाने पोहोल्याने चंदू व अंतू दमले होते. ते श्वास घेत होते तोच त्यांनाही रामने वेगाने मागे टाकले. किनाऱ्यावरच्या मुलांनी आनंदाने आरोळ्या ठोकल्या– 'राम झिंदाबाद !' चंदू व अंतू त्या आरोळ्या ऐकून दचकलेच. पाहतात तो काय–राम आपल्यापुढे वेगाने जात असल्याचे त्यांना दिसले. आता रामच पोहण्यात पहिला येणार हे पाहून त्यांचा रामबद्दलचा द्वेष जागा झाला. ते त्वेषाने रामचा पाठलाग करू लागले. ते बघताच त्यांच्या बेताची कल्पना येऊन पपूही त्यांना लवकर गाठण्याचा प्रयत्न करू लागला. तोपर्यंत व चंदू, अंतू रामच्या अगदी जवळ पोचले.

अंतूच्या हाताला रामचा पाय लागताच आपल्या हाताच्या हिसक्याने त्याने रामचा पाय पाण्यात जोराने खेचला. रामला काय घडत आहे याची काहीच कल्पना नव्हती. तो बेसावध होता. तेवढ्यात चंदू त्याचे डोके घट्ट धरून त्याला पाण्यात बुडवू लागला. मागोमाग पोहत येणाऱ्या पपूने हे पाहिले मात्र !–तो तावडतोब चंदू अन् अंतूच्या पाठीमागे गेला. त्यांच्या बखोटीला धरून त्यांना त्याने जोरात मागे खेचले. आणि तो त्यांच्या नाका-तोंडावर ठोश्यांवर ठोसे चढवू लागला. तो संतापाने अगदी बेभान झाला होता.

पोहण्याच्या स्पर्धेला वेगळेच वळण लागलेले पाहून क्रीडा-

शिक्षक व मानेगुरुजी यांनी या क्षणार्धात नदीत उडी घेतली. आणि ते वेगाने पोहत त्यांच्याजवळ जाऊ लागले.



चंदू–अंतूला गुद्दे चढवीत असताना पपूने जरा मागे वळून पाहिले, तर राम अगदी बुडण्याच्या बेतात होता. नाकातोंडात पाणी गेल्यामुळे तो पाण्यावर येऊन पुन्हा खाली जात होता. मग त्याने चंदू–अंतूला सोडले व बुडणाऱ्या रामकडे धाव घेतली. त्याचा एक हात आपल्या खांद्यावर घऊन आणि आपला हात त्याच्या काखेत घालून पपू झपाटयाने किनाऱ्याकडे जाऊ लागला.

चंदू व अंतू पण पपूने अचानक केलेल्या हल्ल्याने गडबडून गेले होते. सारे काही क्षणात घडले होते. पपूने चढविलेल्या

ठोशांनी त्यांच्यात आता पोहण्याची शक्ती राहिली नव्हती. ते गटांगळ्या खाऊ लागले. पोहत येणाऱ्या गुरुजींनी त्यांना पाहिले आणि सरसर पाण्यावर हात मारीत ते त्यांच्याजवळ पोचले. मग त्या दोघांनी चंदूला व अंतूला काठावर आणले.

राम, चंदू आणि अंतू तिघांच्याही पोटात थोडेफार पाणी गेले होते. गुरुजींनी प्रथम त्या तिघांना पोटावर झोपवून व त्यांच्या पाठीवर दाब देऊन त्यांच्या पोटातले पाणी बाहेर काढले.

पपू दमल्यामुळे जमिनीवर निपचितपणे पडून विश्रांती घेत होता. नंतर माने गुरुजीनी त्या सर्वांना आपल्या घरी नेऊन गरम गरम कॉफी दिली. त्यामुळे त्यांना थोडी हुशारी आली. थोडा तजेला आला. झाल्या प्रकाराबद्दल माने गुरुजींनी सगळ्यांचीच हजेरी घेतली. चंदू व अंतूची त्यांनी चांगलीच कानउघाडणी केली. राम बुडत असल्याचे कळताच मावशी गुरुजींकडे धावत आली होती; परंतु राम सुखरूप असल्याचे पाहून तिच्या जीवात जीव आला. तिला पपूकडून सगळे काही कळले. तिने गुरुजींचे आभार मानले आणि ती पपू आणि रामला घरी घेऊन गेली. त्यांना तिने गरम गरम जेवण दिले.

हळूहळू वातावरण निवळले. तरी बन्या अंतू मात्र पुन्हा एकदा झालेल्या फजितीमुळे पुष्कळ चिडले होते; पण आता चंदूला माः घडलेल्या प्रकाराबद्दल खूप वाईट वाटले. रामशी दुष्टपणाने वागल्याचा त्याला पश्चात्ताप होऊ लागला. यापुढे बन्या आणि अंतुशी मैत्री ठेवणे त्याला योग्य वाटले नाही. काही झाले तरी चंदू मुळात एक चांगला मुलगा होता. त्याचे कर्णधारपद काढून घेतल्यामुळे तो चिडला होता. म्हणूनच त्याने रामबद्दल

मनात राग ठेवला होता. परंतु तरीही त्याच्या मनात रामविषयी आदर होता.

रामला चांगलीच अद्दल घडवावी असे अजून बऱ्या अंतूला वाटत होते. कारण त्यांचा बेत पाण्यातच बुडाला होता. शिवाय, चंदूही त्यांच्याशी बोलेनासा झाला होता. त्यामुळे रामचा बदला आता दोघांनीच घेण्याचे ठरविले होते आणि चंदूने बेइमानी केली म्हणून आपण जे काही करू त्याचे बालंट चंदूवरच आले पाहिजे अशा प्रकारे कट शिजविण्यास त्यांनी सुरुवात केली.

रामला मात्र वाटत होते की, चंदू अजूनही सुधारेल. पुन्हा तो आपला मित्र बनेल. दोन-तीन दिवस चंदू शाळेत आला नव्हता. त्याला थोडेफार लागले होते. राम त्याची नेहमी चौकशी करी. शाळा नेहमीप्रमाणे चालू होती.

+ + +

९ : लकी बॅट हरवली

गुरुवार उजाडला. आज क्रिकेटचा शेवटचा सराव होता. बऱ्या अंतूने आजच आपला बेत तडीस नेण्याचे ठरविले. सर्व मुले मैदानावर जमली.

सारे गुरुजीसुद्धा मुलांचा क्रिकेटचा सराव बघायला मैदानावर

लक्ष नव्हते. क्रिकेटच्या सामन्यापुढे गुरुजींचे शिकवणे कुणालाच ऐकू येत नव्हते. वेळ कसा संपला तेच कुणाला कळले नाही.

शाळा सुटायला दहा मिनिटे बाकी होती. प्रत्येकाने आपापले दफ्तर भरायला सुरुवात केली. रामनेही सवयीप्रमाणे दफ्तराला हात घातला. 'लकी बॅट' आहे की नाही ते चाचपून पाहिले; पण त्याच्या हाताला बॅटच लागेना, म्हणून त्याने बाकाच्या खणात वाकून पाहिले तर लकी बॅट जागेवर नव्हती. ते पाहून त्याला धक्काच बसला. त्याचें सारे अवसानच गळाले. त्या लकी बॅटवर त्याचे जीवापलीकडे प्रेम होते. आता ती हरवली होती. रामला रडू आले. वर्गात शिकविणारे गुरुजी रामची ही चुळबूळ पहातच होते. ते रामजवळ आले आणि त्याच्या पाठीवर हात ठेवून त्याला त्यांनी विचारले,

" काय झालं राम ? "

" गुरुजी, दररोज सराव असतो म्हणून मी माझी लकी बॅट शाळा सुटल्यावरच घरी नेतो. आज मधल्या सुट्टीत मी लकी बॅट वर्गातच ठेवुन गेलो होतो. आता ती हरवलीय. "

" ठीक आहे– घाबरू नकोस ! आपण तुझ्या बॅटचा तपास करू. " गुरुजींनी त्याला धीर देत म्हटले. नंतर ते इतर मुलांकडे वळून म्हणाले,

" मुलांनो, रामची लकी बॅट हरवलीय. तुमच्यापैकी कुणी गंमतीने त्याची लकी बॅट लपवून ठेवली असेल तर त्याने ती परत करावी. "

सर्व मुले आपापसात कुजबूज करू लागली; पण कुणीही उघडपणे काहीच बोलेना. गुरुजींना नवल वाटले. कुणीदेखील चकार-

शब्द बोलत नव्हते. गुरुजींना आता रागच आला. त्यांनी पुन्हा म्हटले,

" ज्याने बॅट लपवली आहे त्याने ती जर पाच मिनिटांच्या आत शोधून दिली नाहीतर त्याला कडक शिक्षा होईल. "

तरीही सगळे चिडीचूप ! नंतर ते चंदूकडे वळून म्हणाले,

" चंदू, तुला माहीत आहे बॅट कुणी चोरली ते ? "

हे ऐकून चंदू दचकलाच. तो लगेच उठून म्हणाला,

" नाही–नाही गुरुजी ! मी लकी बॅट घेंतली नाही–मी ती चोरली नाही–मी-मी मधल्या सुट्टीत बाहेर गेलो होतो–"

" अरे–पण मी कुठं असं म्हणतोय की तू बॅट चोरलीस म्हणून! मी विचारतोय की, मधल्या सुट्टीत वर्गात तू कुणाला थांबलेलं पाहिलंस का ? "

" म-मला माहीत नाही गुरुजी–, " चंदू चाचरत म्हणाला, कारण बन्या व अंतू तेंव्हा त्याच्याकडेच बघत होते. त्यांनी आपली मूठ वळविली होती. ते आपलं काहीतरी बरं–वाईट करतील अशी चंदूला भीती वाटली. त्यामुळे माहीत असूनही त्याने गुरुजींना खोटेच सांगितले.

चंदूसुद्धा नाही म्हणताच गुरुजी शेवटी रामला म्हणाले,

" राम, आपण सगळ्यांचीच तपासणी करू या."

एवढ्यात प्रार्थनेची घंटा झाली. प्रार्थना सुरू होण्यापूर्वी गुरुजींनी मुलांना सूचना दिली. " प्रार्थना संपताच प्रत्येकानं आपापल्या जागेवर बसा. कुणीही जागा सोडू नका. "

प्रार्थना संपताच गुरुजी आणि पपू प्रत्येकाच्या जागेवर जाऊन तपासणी करीत होते. तपास पुरा होईपर्यंत कुणीही जागेवरून हलले नाही. सर्वांची तपासणी संपली; पण दुर्दैवाने लकी बॅट कुणाच्याच बाकात सापडली नाही. गुरुजींना वाईट वाटले. राम आता अगदी निराश झाला होता.

पण बन्या व अंतूला पुष्कळ आनंद झाला. 'कशी खोड मोडली' अशा हेटाळणीने रामकडे पहात दोघंही वर्गाबाहेर पडले. बाकीची मुलेही वर्गातून बाहेर गेली. चंदू जाताना रामला म्हणाला,

"तुझी लकी बॅट हरविल्याबद्दल मला फार वाईट वाटतं राम. पण मी तुझी लकी बॅट शोधन काढीन–" असे म्हणून तो निघून गेला.

चंदू जाताना पाहून पपू हळूच पुटपुटला,

"चोर तो चोर अन् वर सावगिरी करतोय !"

रामने ते ऐकून पपूला म्हटले,

"असं बोलणं बरं नाही पपू–"

रामचा आता खूपच विरस झाला. क्रिकेट खेळण्याचा, शाळेला सामना जिंकून देण्याचा त्याचा उत्साहच मावळला. गुरुजींना तो काकुळतीने म्हणाला,

"मी आता खेळूच शकणार नाही गुरुजी ! लकी बॅट म्हणजेच माझं खरं यश होतं–" असे म्हणून तो खाली मान घालून घरी निघून गेला.

गुरुजींना आणि पपूला रामच्या बोलण्याचे नवल वाटले. त्याच-

बरोबर त्यांना चिंता वाटली. मग त्या गुरुजींनी बराच विचार करून घडलेली सगळी घटना माने गुरुजींच्या कानावर घातली. ती सर्व हकिकत ऐकताच माने गुरुजी तसेच तडक रामच्या घरी निघाले.

१० : निराश राम

शाळा सुटून बराच वेळ झाला तरी राम अजून घरी परतला नव्हता. मावशीला रामची काळजी वाटू लागली. कारण दोन-तीनदा त्याच्यावर संकट ओढवलेले होते. नदीतल्या संकटातून तर तो सुदैवानेच वाचला होता. त्यामुळे अजूनही राम घरी परतला नाही म्हणून मावशीच्या जिवाला एकाप्रकारची हुरहुर लागली. ती व्याकुळ होऊन दरवाजात उभी राहून रामची वाट पाहत होती.

इतक्यात तिला राम येताना दिसला. तो खाली मान घालून येत होता. ते पाहून मावशी एकदम चरकली– " आता पुन्हा काय घडले असावे?"

राम जवळ येताच मावशीला त्याचा चेहरा उतरलेला दिसला. त्याचे दप्तर हातात घेऊन तिने विचारले, " राम, इतका कसा उशीर झाला बरं तुला ?"

पण मावशीच्या प्रश्नाला उत्तर न देता राम आपल्या खोलीत गेला आणि बाजेवर अंग झोकून देऊन तो मुसमुसू लागला. दप्तर खुंटीला टांगून मावशी रामच्या पाठोपाठ त्याच्या खोलीत गेली. पाहते तो राम हुंदके देतोय. मावशीला वाईट वाटले. ती मायेने कळवळली. आणि त्याच्याजवळ बसून त्याच्या पाठीवर ममतेने आपला हात फिरवीत राहिली. काही वेळाने रामचे मुसमुसणे थांबले. तो गप्प पडून राहिला. मावशी जवळच त्याच्याकडे पहात बसली. होती. पण तो काहीच बोलला नाही. तेव्हा शेवटी पुन्हा मावशीनेच त्याला विचारले,

" काय झालं राम ? मारलं तुला कुणी ?"

राम काही बोलला नाही.

" बरं तर–गुरुजी तुला काही बोलले का ?"

मावशीने इतके विचारले, पण रामचे हूं नाही का चूं नाही. तो आपला गप्पच ! तोच मावशीच्या लक्षात आले की, आज शाळेतून परत येताना रामने आपली ' लकी बॅट ' आणली नाही. मग तिने विचारले.

" राम–अरे, तुझी लकी बॅट परत आणली नाहीस ती ?"

मावशीने लकी बॅटचे नाव काढताच राम पुन्हा मुसमुसू लागला. त्याबरोबर मावशी गोंधळूनच गेली. तो बोलत नाही, काही नाही आणि बॅटबद्दल विचारताच तो पुन्हा रडतोय. मावशीला काहीच कळेना. रामचे हुंदके आणखी वाढले. तेवढ्यात मानेगुरुजी आले. घरात येता येताच त्यांनी विचारले.

" मावशी,—राम आहे का घरात ?"

गुरुजींची ती हाक ऐकताच मावशी चटकन् उठून बाहेर आली आणि म्हणाली.

" या गुरुजी. हा पहा इथे रडत बसलाय राम ! विचारलं तर काही बोलतही नाही. "

" अहा रे रडूबाई !

गुरुजींचे ते बोलणे ऐकताच रामचे रडणे एकदम थांबले. त्यामुळे मावशीलाही जरा बरे वाटले. गुरुजी रामच्या खांद्यावर हात ठेवीत खाली बसले.

त्या बरोबर राम मुसमुसत म्हणाला,

" गरुजी— माझी लकी बॅट ! "

" वेडा रे वेडा ! आणि बॅटकरीता तुला रडायला हवं ?"

" पण गुरुजी, ती माझी लकी बॅट होती ! "

" बरं, तर ती चोरली कुणी ? बहुतेक चंदूनेच ती बॅट लपवली असेल—त्याला आपण कर्णधार बनवलं नाही म्हणून ! "

" नाही गुरुजी—चंदू असं कधीच करणार नाही ! तो माझी बॅट लपविणार नाही. "

" बरं—आपण तुझी बॅट शोधून काढू ! नाही मिळाली तर मी तुला दुसरी नवी बॅट देईन. मग तर झालं ?"

" नको गुरुजी—मला दुसरी बॅट नको ! माझ्या लकी बॅटशिवाय मी खेळूच शकणार नाही. मुंबईच्या शाळेत असताना मी जे सामने जिंकले ते त्याच बॅटमुळे—" राम निराश होऊन म्हणाला.

रामचे म्हणणे गुरुजींना अजिबात पटले नाही. ते त्याला म्हणाले.

" राम, तुझ्यासारख्यानं असं बोलणं ठीक नाही. बाकीच्या खेळाडूंना काय वाटेल ? आणि तू जर खेळला नाहीस तर आयत्यावेळी कर्णधार कुणाला बनवायचं ? ' आनंदवाडीच्या शाळेनं न खेळता क्रिकेटच्या सामन्यात माघार घेतली; असा बट्टा आपल्या शाळेला लागला तर ते तुला आवडेल ?"

" तसं नाही गुरुजी. पण–लकीं बॅट नसेल तर खरंच मला खेळता येणार नाही. चंदूला संघात घ्या. त्यालाच तुम्ही कर्णधार बनवा ! मला माफ करा–" असे म्हणून रामने गुरुजींचे पाय धरले.

गुरुजी त्याला उठवीत म्हणाले.

" उठ बाळ, तुझ्या मनातली ही वेडी समजूत आधी काढून टाक, आणि नीट विचार कर ! तू खेळलंच पाहिजे अशी माझी तुला आज्ञा आहे. उद्या सकाळी नवी बॅट घेऊन शाळेजवळ मी तुझी वाट पाहतोय. आता मी निघतो. मावशी, तुम्हीदेखील याची जरा समजूत घाला–" असे म्हणून गुरुजी निघून गेले.

गुरुजी जाताच मावशी रामजवळ आली. रात्र झाली होती. रामला उठवीत मावशी म्हणाली, " चल बरं–आता जेवून घे. बराच वेळ झालाय–"

" मावशी, मला जेवायला नको. भूकच नाहीय. "

" ठीक तर ! मग मलाही भूक नाही. मीसुद्धा जेवणार नाही. होईल ना तुझं समाधान ?" असे म्हणून मावशी अगदी खोटेच रुसून बसली.

मावशी जेवणार नाही हे ऐकताच रामची मात्र गाळणच उडाली. तो मुकाटयाने उठला आणि हातपाय धुवून देवाला नमस्कार करून जेवायला बसला. मावशी मनात खुदकन् हसली. तिची मात्रा एकदम लागू पडली होती. त्याच्याबरोबर तिनेही आपले ताट वाढून घेतले, जेवता जेवता तिनें रामला विचारले, "मग जाणार ना तू उद्या खेळायला ?"

"पण मावशी–"

"आता काही बोलू नकोस तू. मोठ्यांचं नेहमी ऐकावं आणि गुरुजनांचं तर नेहमीच ऐकलं पाहिजे. ते काही नाही. तू खेळलंच पाहिजेस ! जेवल्यावर शांतपणे झोप आणि सकाळी लवकर उठून शाळेत जा. गुरुजी तुझी वाट बघतील. जाशील ना त उद्या ?"

"हो–" रामने शेवटी नाइलाजाने कबूल केले.

इकडे चंदू मात्र आपल्या घरी रात्रभर तळमळत होता. राम लकी बॅटशिवाय खेळू शकणार नाही हे त्याला ठाऊक होते. रामशी तो अगदी वाईट वागला होता. रामला त्याने संकटात आणले होते. या सगळ्या गोष्टींबद्दल त्याला आता पश्चाताप होत होता. त्याचे डोळे अश्रूंनी भरले होते. त्याला पुन्हा रामची मैत्री हवी होती. आणि ती लकी बॅट नक्कीच बन्या व अंतूने लपवली असावी असा संशय चंदूला वाटत होता. तेव्हा सकाळ होताच ती लकीबॅट शोधून काढण्याचा त्याने निश्चय केला.

✠ ✠ ✠

११ : लकी बॅट सापडली ! पण...

पहाटेलाच लवकर उठलेल्या मावशीने रामला हलवून जागे केले. राम निरुत्साहानेच उठला. मनातून त्याला खरे म्हणजे खेळायचेच नव्हते. लकी बॅटची त्याला सारखी आठवण येत होती. रामने न्याहरी करून कपडे केले व सामन्यासाठी जाण्याची सर्व तयारी केली. क्रिकेटचा गणवेश त्याने आपल्याबरोबर घेतला.

सगळी तयारी होताच राम मावशीबरोबर शाळेकडे निघाला. मावशी त्याला वाटेत सतरांदा बजावीत होती – 'कुणाशी भांडायचं नाही. गुरुजींना सोडून कुठं जायचं नाही. सर्वांशी समजून वागायचं. तुमच्या शाळेला विजय मिळालाच पाहिजे !'

मध्येच त्यांना चंदू भेटला; पण मावशी त्याच्याशी एकही शब्द बोलली नाही, कारण मागे चंदूमुळेच रामवर संकटे ओढवली होती. त्यामुळे तिच्या मनात चंदूबद्दल थोडासा रागच होता. पण चंदूने रामला एका बाजूला घेऊन – 'कोणत्याही परिस्थितीत लकी बॅट शोधून काढून तालुक्याच्या सामन्याच्या ठिकाणी घेऊन येईन–' असे त्याला वचन दिले आणि त्याचा निरोप घेऊन चंदू नदीच्या दिशेने गेला. बन्या व अंतू यांनी लकी बॅट कुठे लपवली असेल याचा अंदाज त्याला होताच. चंदू निघून जाताच तो लकी बॅट शोधायला गेला असल्याचे रामने मावशीला सांगितले व चंदूविषयी तिचे

मन साफ केले. मावशीलाही ते ऐकून चंदूशी न बोलल्याबद्दल वाईट वाटले.

मावशी अन् राम शाळेजवळ पोचले. साडेआठ वाजता शाळेची बस सुटणार होती. खेळांडूबरोबर शिक्षक व इतर मुलेही बसमध्ये होती. तयारीची एकच गडबड चालली होती. राम येताच माने गुरुजींनी शाळेतून आणलेली नवी बॅट त्याला दाखवली. रामचे मन वळविल्याबद्दल त्यांनी प्रथम मावशीचे आभार मानले आता सर्वजण बन्या आणि अंतू यांची वाट पाहू लागले. ते अचानक कुठे तरी गायब झाले होते.

इकडे चंदू रामचा निरोप घेऊन जो निघाला तो झपाझप नदीच्या दिशेने चालला होता. बन्याने व अंतूने चंदूला त्या बाजूने जाताना पाहिले आणि तेही गुपचूप त्याच्यामागोमाग निघाले. एका जुनाट झाडाजवळ येताच चंदूने त्या झाडाच्या ढोलीत हात घालून पाहिले. त्याच्या हाताला काही लागले नाही. मग तो टेकडीच्या दिशेने गेला. टेकडीच्या त्या बाजूला एक छोटेसे भुयार होते. चंदूने त्या भुयारात देखील चाचपून पाहिले; पण तेथेही त्याला लकी बॅट सापडली नाही.

मग मात्र चंदू निराश झाला. आता देवच आपला पाठीराखा या विचाराने तो टेकडीवरच्या श्रीविठोबाच्या देवळात गेला. त्याच्या पाठीवर बन्या व अंतू होतेच. देवळात पुजारी जाग्यावर दिसत नव्हता. तो कुठे तरी बाहेर गेला असावा. चंदूने मनोभावे हात जोडले. देवाची प्रर्थाना केली. तो थोड्या वेळाने डोळे उघडून पाहतो तो काय, देवाच्या मूर्तीच्या चौथऱ्याच्या तळाशी त्याला काहीतरी पिवळी वस्तू चमकलेली दिसली. त्याने नीट निरखून पाहिले.

तर ती लकी बॅटच होती. चंदूनें वाकून हळूच ती बॅट चौथऱ्या खालून बाहेर काढली. 'लकी बॅट' मिळताच त्याने आनंदाने एक आरोळी ठोकली.

एवढ्यात दरवाजा धाडकन् बंद केल्याचा आवाज त्याला ऐकू आला. चंदूने चमकून मागे पाहिले तर दरवाजा बंद झाल्यामुळे त्याला कुणीच दिसले नाही. तो ताबडतोब बाजूला असलेल्या खिडकीजवळ धावला. तिथून त्याने बन्या-अंतू दरवाजाची कडी लावीत असलेले पाहीले. त्यांना पाहून चंदूने ओरडून म्हटले ;

" बन्या, ऽ कडी काढ दाराची–"

" आता बस इथेच लकी बॅंट घेऊन. "– बन्या म्हणाला.

बन्या-अंतू दुष्टपणाने हसले. त्यांनी चंदूच्या ओरडण्याकडे लक्ष दिले नाही. ते धावत धावत शाळेच्या रोखाने गेले. बस सुटायला पाच मिनिटे बाकी होती. बन्या-अंतू धावतच बसमध्ये जाऊन बसले.

इकडे देवळात थोडयाच वेळात पुजारी आला. देवालयाचा दरवाजा बंद पाहून त्याला आश्चर्य वाटले. 'आतमध्ये कोण असावे ?' याचा विचार करीत पुजाऱ्याने कडी काढून देवालयाचा दरवाजा उघडताच त्याला आंत चंदू दिसला. चंदूने पुजाऱ्याला घडलेली सर्व हकिकत सांगितली. देवळातून सुटका होताच चंदू 'लकी बॅंट' घेऊन शाळेच्या दिशेने धूम पळत सुटला. तो शाळेच्या बसजवळ पोचणार तोच 'फुर्रर्र ऽ' करीत बस सुटली. ते पाहताच चंदू मटकन खाली बसला. रामला पोचवायला आलेली मावशी अजून तिथेच उभी होती. तिने चंदूला पाहिले व त्याच्याजवळ जाऊन त्याला वर उठवीत विचारले, " काय झालं बरं चंदू. ? "

"मावशी, लकी बॅट सापडली पण –" असे म्हणून चंदूने घडलेल्या सर्व गोष्टी मावशीला सांगितल्या. मग मावशीने त्याला म्हटले,



"शहाणा मुलगा आहेस तू ! पण आता बिलकूल काळजी करू नकोस. आता तू जेऊनच लकी बॅट घेऊन तालुक्याला जायला नीघ. मीही तुझ्याबरोबर येईन. साडेदहा वाजता तालुक्याला जाणारी एस. टी. आहे. चल आता –" असे म्हणून मावशी चंदूला आपल्या घरी घेऊन गेली.

✠ ✠ ✠

१२ : सामन्याला सुरवात

बरोबर नऊ वाजता 'आनंद विद्यालया' ची बस तालुक्याच्या 'मराठी विद्यामंदिरा' च्या आवारात शिरली. सारी शाळा शृंगारली होती. रंगबेरंगी पताकांची रोषणाई शाळेच्या इमारतीवर व क्रीडांगणाच्या प्रवेशद्वारावर केली होती. विद्यार्थी-विद्यार्थिनींचा थवा जमला होता. सर्वजण हर्षाने फुलले होते. हास्याचे फवारे, विनोदाचे कारंजे थयथयत होते. कार्यकर्त्यांची धावपळ चालू होती. जिल्हापरिषदेचे अध्यक्ष श्री वसंतराव कवठेकर सामना पहायला जातीने हजर होते. त्यांच्या शुभहस्ते क्रीडाज्योत पेटविण्यात आली.

दोन्ही शाळांचे क्रिकेटवीर क्रीडांगणावर उतरले. दोन्ही शाळांचे क्रीडाशिक्षक मिळून दोन पंच होते. मराठा विद्यामंदिराचा कर्णधार जीवन व आनंद विद्यालयाचा कर्णधार राम समोरासमोर आले. सामन्याला सुरुवात होत असल्याची सूचना देणारी घंटा होताच पंचानी नाणे फेक केली. कर्णधार जीवनने नाणेफेक जिंकली. नाणेफेकीचा कौल आपल्या विरुध्द जाताच कर्णधार रामला पहिलाच निराशेचा धक्का बसला. आनंद विद्याल. याच्या सर्व खेळाडूंच्या मनात पराभवाच्या शंकेची पाल चुकचुकली.

दोन्ही कर्णधारांनी प्रथम एकमेकांशी हस्तांदोलन केले. आणि सामन्याला सुरुवात झाली. आनंद विद्यालयाचा संघ क्षेत्ररक्षणासाठी आला. सर्व मुले टाळ्या वाजवू लागली, ओरडू लागली.

बन्या व अंतू आलटून पालटून गोलंदाजी करू लागले. मराठा विद्यामंदिराचे खेळाडू फलंदाजी करीत होते. जयवंत व सुरेश हे त्यांचे सलामीचे फलंदाज होते. ते चिवटपणे फलंदाजी करू लागले. त्यांच्या वीस धावा झाल्या तरी एकही फलंदाज बाद झाला नाही. खेळावर मराठा विद्यामंदिर संघाची अशी सुरेख पकड बसत गेली की त्या संघाची मुलेमुली आनंदाने बेहोश झाली. अजूनही कुणी बाद होत नाही हे पाहून रामने गोलंदाजी आपल्याकडे घेतली. आपण टाकलेल्या पहिल्या षटकात रामने जयवंतला झेलबाद केले. जयवंतचा उडालेला झेल रवीने अचूक झेलला. मुलांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आनंद विद्यालयाच्या खेळाडूंना हायसे वाटले. जयवंतच्या जागी महादेव खेळायला आला.

रामच्या बरोबर पपूही गोलंदाजी करू लागला. पण आता मात्र विरुद्ध संघाचा कुणीही फलंदाज बाद झाला नाही. त्यांच्या धावा वाढतच होत्या. रामने बन्या-अंतूकडे पुन्हा गोलंदाजीसाठी चेंडू दिला. सुरेश व महादेव झपाटयाने धावात भर टाकीत होते. बन्या अंतूंच्या गोलंदाजीला ते बिलकुल दाद देत नव्हते. मराठा विद्यामंदिर संघाची धावसंख्या चौकार-षटकारांच्या आतषबाजीत एकदम पन्नासवर पोचली. ते पाहताच रामने आता पपूला पुन्हा गोलंदाजी करावयास पाठविले. यावेळी पपूने आपल्या गोलंदाजीची कमाल केली; पण त्याच्या चेंडूवर चौकार लगावीत सुरेश व महादेवने आपल्या संघाची धावसंख्या एकाहत्तर पर्यंत वाढविली.

एकाच बाजूला खेळाचे पारडे जड होत असल्याचे पाहून सर्वजण कंटाळले. आनंद विद्यालयाची काही मुले म्हणू लागली,

"पाहिलंत, नवीन आलेल्या रामला आपल्या शाळेचा कर्णधार

म्हणून घेतल्याचा प्रताप ! आपला संघ आता मराठा विद्यामंदिराशी बरोबरी तरी करेल की नाही शंकाच आहे ! "

परंतु पपूच्या पुढच्याच उसळी घेऊन वेगाने येणाऱ्या चेंडूवर चौकार मारण्याच्या तयारीत असलेल्या सुरेशचा त्रिफळा उडाला. दुसरा फलंदाज बाद झाला. शेवटी कर्णधार जीवनने दोन बाद एकाहत्तर धावांवर आपल्या संघाचा पहिला डाव घोषित केला. कर्णधार जीवनच्या या खिलाडू वृत्तीचे सर्वांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

अकरा वाजून गेले होते. मराठा विद्यामंदिराचा संघ क्षेत्ररक्षणासाठी आला. कर्णधार जीवनने महादेव व वसंत या जोडीकडे गोलंदाजी दिली. आनंद विद्यालयाची बन्या-अंतू ही सलामीची फलंदाजांची जोडी खेळावयास आली. आणि भोपळाही न फोडता परत तंबूत निघून गेली. सर्वांनी त्यांची 'हुर्यो' केली. या पहिल्याच हिसक्याने खरोखरीच आनंद विद्यालयाचा संघ हादरला हा सामना निराशाजनक होण्याचीच चिन्हे होती.

पपू व रवी फलंदाजीसाठी आले. पपू खेळत होता. महादेवने पपूच्या रोखाने चेंडू टाकला. क्षणातच तो चेंडू फटकावून पपूने दोन धावा केल्या. आनंद विद्यालयाच्या मुलांनी टाळ्या वाजवून त्याला प्रोत्साहन दिले. पण महादेवच्या पुढच्याच चेंडूने स्टम्पच्या दिशेने उसळी घेतली आणि पपू त्रिफळाचित झाला.

रामने विलासला पाठविले. गोलंदाजांची अदलाबदल झाली. वसंतने चेंडू टाकताच रवीने तो फटकारला आणि त्याने एक धाव केली.

राम पॅड बांधून तंबूत बसला होता. पण आपणास खेळावयास जाण्याची पाळी न येवो असा तो देवाचा धावा करीत होता. त्याला नको ते खेळ पाहणे असे झाले होते. पण इतर मुले मात्र डोळ्याचें पाते लवू न देता एकाग्रतेने खेळ पहात होती. आनंद विद्यालयाच्या आतापर्यंत पंधरा धावा झाल्या होत्या. महादेवने तिसऱ्यांदा गोलंदाजी केली. रवी कणखरपणे गोलंदाजीला तोंड देत होता. चेंडू त्याच्या पायाला लागला. विरोधी खेळाडू ओरडले,

"हाऊंज दॅट ?"

"आऊट !" पंच म्हणाले. आनंद विद्यालयाने चार फलंदाज गमावले नि फक्त पंधरा धावा केल्या. ते फार दुःखी झाले. मराठा विद्यामंदिराच्या मुलांनी आनंदाने उड्या मारल्या. शिट्ट्या वाजविल्या.

त्यानंतर राम विकेटकडे निघाला. राम तरी आता काही करील या विश्वासाने त्याच्या बाजूच्या मुलांनी तो विकेटपाशी जात असतांना टाळ्यांचा कडकडाट चालविला होता. पण पुढे काय झाले ?

राम आतिशय घाबरून, बिचकतच खेळू लागला. वेगवान चेंडूंचे त्याला भय वाटू लागले. मंदगती व फसव्या गोलंदाजीवरही तो बिचकूनच खेळत होता. रामच्या आजच्या खेळात आत्मविश्वास नव्हता, तडफ नव्हती आणि जोशही नव्हता. त्याचा हा खेळ मानें गुरुजी लक्षपूर्वक पहात होते. आनंद विद्यालय संघाच्या फक्त वीस धावा झाल्या होत्या. वसंतच्या तिसऱ्या चेंडूवर राम कसातरी खेळला होता; परंतु त्याच्या चौथ्या चेंडूचा रामला

अंदाज लागला नाही. त्या चेंडूने रामचा त्रिफळा उडवला; राम बाद झाला.

आपल्या तंबूत परतल्यावर रामने पॅड्स सोडले. 'आपण लोकरु बाद झालो. आपल्या संघाच्या धावा आपण वाढवू शकलो नाही' या विचाराने रामचा खूपच विरस झाला. तेवढ्यात माने गुरुजी त्याच्यामागोमाग तंबूत आले. त्याला समजावीत व धीर देत ते म्हणाले,

"राम–बाळ निराश होऊ नकोस! पण एक लक्षात ठेव. तुझ्या हातात ही बॅट आहे ना ती चेंडू अडविण्यासाठी नाही तर चेंडू त्वेषाने टोलविण्यासाठी आहे ! शिवाय, वेगवान चेंडूला घाबरतोस कशाला ? चेंडू मंदगती किंवा जलदगती असला तरी फोडून काढला पाहिजे!"

" माफ करा गुरुजी –मी चुकलो ! पण त्यावेळी माझी 'लकी बॅट ' असती तर – "

रामने लकी बॅटचे नाव काढताच माने गुरुजी गप्प झाले. त्याच्या पाठीवर हात फिरवून ते काही न बोलता खोलीच्या बाहेर गेले. रामलाही मग वाईट वाटले. उपाहारापूर्वी एक दोन मिनिटे अगोदर आनंद विद्यालयाचे सर्व गडी एकूण एकवीस धावा काढून बाद झाले. पहिला डाव संपला. विरोधी संघ पन्नास धावांनी पुढेच होता. तालुक्याचीच शाळा सामना जिंकणार असाच एकूण रंग दिसत होता.

मराठा विद्यामंदिर संघाच्या कर्णधार जीवनने आनंद विद्यालय संघाला ' फॉलोऑन ' दिला. त्यामुळे मराठा विद्यामंदिरच्या

मुलांनी आनंदाने एकच जल्लोष केला. आनंद विद्यालयाचा संघ पन्नास धावांच्या ओझ्याखाली दबून गेला होता. त्यांच्यापैकी रामसकट कुणालाच आता सामना जिंकण्याचो खात्री वाटत नव्हती. त्यांच्यातील काही मुले रामलाच दूषणे देत होती. आणि त्यांच्या टोचणाऱ्या प्रत्येक शब्दाने राम घायाळ होत होता.

✠ ✠ ✠

१३ : आनंदी आनंद गडे

सर्वजण भोजनास बसले होते. आणि आता सुरुवात करणार तोच एक आनंदाची बातमी आली. रामची मावशी व चंदू आला होता. माने गुरुजी त्यांना आत घेऊन येत होते. शिवाय 'लकी बॅट' शोधून काढल्याबद्दल त्यांनी चंदूला शाबासकीही दिली. रामला चंदू 'लकी बॅट' घेऊन आल्याचे कळताच खूप आनंद झाला. त्याने धावतच येऊन चंदूला मिठी मारली. अन् आपण रामच्या मित्रत्वाला जागलो म्हणूनच चंदूही आनंदीत झाला. राम मावशीलाही भेटला. चंदूने 'लकी बॅट कशी मिळविली' ते मावशीने सर्वांना कौतुकाने सांगितले. चंदूच्या या पराक्रमाने सगळ्यांना आनंद झाला. आनंद विद्यालयाच्या सर्व खेळाडूंमध्ये पुन्हा एकदा उत्साह संचारला. पण बन्या-अंतू मात्र खजील झाले. 'आपल्यामुळेच सामन्याचा पहिला डाव आपल्या संघाच्या हातून निसटला. सगळ्यांनाच मनःस्ताप सहन करावा लागला.' या

विचाराने बन्या-अंतूला पश्चाताप आला. त्यांनी सर्वांची माफी मागितली.

परंतु झाल्या प्रकाराबद्दल दोष देऊन कुणीही बन्या-अंतूला दुखविले नाही. सर्वजण भोजनास बसले, राम, पपू, चंदू मावशीच्या बाजूला बसले होते. मावशीने बन्या-अंतूलासुद्धा आपल्याजवळ बसवले. त्यामुळे त्यांनादेखील थोडासा धीर आला. आनंदी वातावरणात सगळ्यांचे भोजन संपले.

जेवणाची सुट्टी संपताच सगळी प्रेक्षक मुले, गुरुजी, मावशी, चंदू वगैरे क्रीडांगणावर येऊन बैठकीवर बसले. सामन्याच्या दुसऱ्या डावास सुरुवात झाली.

'फॉलो ऑन' मिळाल्यामुळे रामचा 'आनंद विद्यालया'च संघ फलंदाजीस आला. बन्या-अंतूची सलामीची जोडी पुन्हा खेळावयास आली; पण त्या दोघांचेही मन अजून गोंधळलेले होते. त्यांच्यांत खेळण्याची तडफच राहिली नव्हती. बन्या साशंकपणेच फलंदाजी करीत होता. जीवनची गोलंदाजी चालू होती. षटकातल्या शेवटच्या चेंडूवर बन्याचा झेल जीवननेच घेतला. आणि बन्या भोपळाही न फोडता आऊट झाला. बन्याच्या जागी पपू आला. आता महादेव गोलंदाजी करीत होता. त्याचा पहिलाच चेंडू फटकारून अंतूने एक धाव घेतली आणि दुसरी धाव करणारा तोच चेंडू अडविणाऱ्या जीवनने दांडी उडवली अन् अंतू धावचीत होऊन तंबूत परतला.

आनंद विद्यालयाचा दुसराही फलंदाज क्षणात बाद झालेला पाहून पुन्हा सर्व मुले 'हुर्यो' करून ओरडू लागली. दोन गडी बाद होऊनही आनंद विद्यालयाची एकच धाव झाली होती.

त्यामुळे तालुक्याचीच शाळा सामना जिंकणार असाच एकूण रंग दिसत होता. पण रवी खेळायला आल्यावर मात्र सामना रंगू लागला. पपू आणि रवीची जोडी चांगलीच जमली. वसंत गोलंदाजी करीत होता. संधी साधून पपूने तीन धावा केल्या. जागा बदलल्याने मग रवी फलंदाजी करू लागला. धडाडीने खेळून रवीने दोन चौकार मारले. मुले ओरडून प्रोत्साहन देऊ लागली. पपूसुद्धा कुशलतेने चेंडू फटकावीत होता. अर्ध्या तासाच्या आत त्याने पाच चौकार मारले. सामन्याला विलक्षण कलाटणी मिळत होती.

रवी आता चौकार मारण्याच्याच बेताने खेळू लागला. त्याची बॅटवरची पकड सैल झाली. जीवनने लगेच ही संधी साधून चेंडू रवीच्या बॅटच्या रोखाने फेकला. चेंडू त्याच्या बॅटला पुसटपणे स्पर्श करून विकेटकीपर विजयच्या हाती झेल गेला. रवी बाद झाला तेव्हा संघाच्या एकूण बत्तीस धावा झाल्या होत्या. कर्णधार राम दिमाखात आपली 'लकी बॅट' घेऊन संथपणे चालत विकेटजवळ आला. सर्वांनी टाळ्या वाजवून त्याचे स्वागत केले. नेहमीप्रमाणे बॅट कलती ठेवून राम खेळत होता. आवडती 'लकी बॅट' मिळाल्याने रामच्या अंगी अमाप उत्साह संचारला होता. चौकार षट्कार ठोकून त्याने पंचवीस धावांची मजल मारली. पपूही त्याला चिकाटीने साथ देत होता. त्यानेसुद्धा आणखी अठरा धावांची भर घातली आणि आपल्या खात्यावर एकेचाळीस धावा जमा केल्या.

सामना आता खूपच रंगात आला होता. विरोधी संघाची धावांची आघाडी तोडली जाऊन आनंद विद्यालयाची धावांची

घोडदौड चालू होती. मुले 'बक्अप ! बक्अप ! ' म्हणून खेळाडूंना प्रोत्साहन देत होती. रामने फंटकावलेले चेंडू तुफानी वेगाने हिरवळीवरून जात असताना सर्व मुलांच्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहू लागले. ती मुले टाळ्या वाजवून आपला आनंद व्यक्त करू लागली.

सर्वजण डोळ्यात प्राण आणून खेळ पहात होते. कारण आता चहापानाच्या सुट्टीला थोडाच अवधी राहिला होता. तीन वाजायला आले होते. आणि आनंद विद्यालय संघाने आपली बाजू सावरली तरी मराठा विद्यामंदिर संघाचा अजून दुसरा डाव खेळायचा बाकी होता आणि संध्याकाळो सहा वाजता सामना संपणार होता. यामुळेच सगळ्यांना 'सामना कोण जिंकणार की अनिर्णित राहणार ' याविषयी उत्सुकता लागून राहिली होती.

पण राम तडफदारपणे खेळत होता. महादेवची वेगवान गोलंदाजी चालू होती आणि महादेवच्या पुढच्याच चेंडूवर रामने एक सणसणीत 'स्क्वेअर ड्राइव्ह' मारला. सर्वांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. रामच्या खात्यावर पंचावन्न धावा झाल्या. त्याचे अर्धशतक झाले होते. आनंदी विदयालय संघाने दुसऱ्या डावात तीन गडी बाद एकशेपाच धावांचा डोंगर रचला नि कर्णधार रामने आपल्या संघाचा डाव घोषित केला. आनंद विदयालय पंचावन्न धावांनी पुढे होते. चहापानाची वेळ झाली होती. चहापानानंतर पुन्हा खेळ सुरू झाला.

आता सामन्यात खरी चुरस निर्माण झाली. मुले ओरडून गोंगाट करू लागली. जोरजोराने शिट्ट्या वाजवू लागली; पण शिक्षकांनी त्या सर्वांना शांत केले. मराठा विद्यामंदिराने आपल्या दुसऱ्या डावास

सुरुवात केली. त्यांचे जयवंत व सुरेश हे सलामीचे फलंदाज खेळत होते.बऱ्याच्या पहिल्याच चेंडूवर जयवंतने चौकार मारला त्या बरोबर सर्वांनी टाळ्यांचा एकच गजर केला; पण ते षटक संपल्यानंतर रामने आपल्या हाती चेंडू घेतला. तो आत्मविश्वासाने गोलंदाजी करू लागला आणि पुढच्याच चेंडूवर रामला चौकार मारण्याच्या प्रयत्नात जयवंतचा त्रिफाळा उडाला. पुन्हा एकदा सगळ्यांनी टाळ्या वाजवून रामच्या गोलंदाजीला दाद दिली. त्या उत्साहात रामने अवघ्या वीस धावात विरोधी संघाचे चार खेळाडू बाद करून 'मराठा विद्यामंदिर'च्या फलंदाजीचे कंबरडेच मोडून काढले. क्रीडांगणावर चैतन्य निर्माण झाले. मराठा विद्यामंदिरच्या फलंदाजांनी यावेळी रामच्या गोलंदाजीचा धसकाच घेतला. आता त्यांचा कर्णधार जीवन खेळायला आला व रामने पपूकडे गोलंदाजी दिली. पपूच्या गोलंदाजीवर रमेशने चटकन एक धाव घेतली. आता जीवनची खेळी होती. पपू तुफानी गोलंदाजी करू लागला. त्याचे चेंडू विकेटवरून उंच जातील अशारीतीने बंप होऊ लागले. या वेळेस रामने लेगजवळ सहा क्षेत्ररक्षक उभे केले. पपूने पाचवा चेंडू नेमका मधल्या यष्टीवर टाकला. त्या अचूक चेंडूने यष्टीवरच्या दोन्ही बेल्स धक्याने वर उडाल्या आणि यष्टीचीत होऊन केवळ शून्यावर कर्णधार जीवन तंबूत परतला. तेव्हा सर्व मुले 'हिप् हिप् हुर्रे हिप् हिप् हुर्रे' अशी ओरडू लागली. मराठा विद्यामंदिर संघाने फक्त एकवीस धावावर पाच गडी गमावले होते.

जीवन बाद झाल्यावर वसंत खेळावयास आला आणि पपूने षटकातला शेवटचा चेंडू आपल्या हातात घेतला. 'सुं ऽ ई ऽऽ–' चेंडू वसंतच्या रोखाने गेला. वसंतने तो चेंडू त्वेषाने फटकावला

पण तो बन्याच्या छातीवर आदळून उडाला त्याच क्षणी स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करीत असलेल्या चपळ रामने सूरकांडी मारून जमिनी पासून काही इंचावर तो झेल पकडला. मराठा विद्यामंदिराला हा एकदा हादरा मिळाला.

मराठा विद्यामंदिर – सहा गडी बाद एकवीस धावा !

रामची 'लकी बॅट' सापडल्याने रामबरोबर त्याच्या संघाडयांमध्येसुद्धा आत्मविश्वास निर्माण झाला होता. आनंद विद्यालय संघाची बाजू पूर्णपणे सावरून मराठा विद्यामंदिर संघाची घसरगुंडी सुरू झाली होती. आता मराठा विद्यामंदिराची नारायण व दीपक ही शेवटची फलंदाजांची जोडी खेळत होती. त्यांच्या एकूण नऊ गडी बाद तीस धावा झाल्या होत्या. सामन्याला पंधरा मिनिटे बाकी होती. मग सामना संपणार कदाचित सामना अनिर्णित राहण्याची शक्यता होती. पण आनंद विद्यालयाला मात्र सामना जिंकण्याची जबरदस्त आशा वाटत होती. परंतु काही मिनिटांचाच अवधी होता, तोवर काही घडले तरच !

बन्याची गोलंदाजी चालू होती. आणि शेवटचा चमत्कार घडला. बन्याच्या षटकातला शेवटचा चेंडू फटकवण्याच्या प्रयत्नात नारायणचा उडालेला झेल स्क्वेअरलेगला उडाला व पपूने अलगद झेलला. टाळ्या-शिट्टयांचा एकच कोलाहल झाला. मैदानावर धावली. जिंकलेल्या खेळाडूंना मिठ्या मारून आपला आनंद व्यक्त केला. चंदूने रामला कडकडून मिठी

मराठा विद्यामंदिर संघाच्या सर्व गडी बाद तीस धावा झाल्या होत्या. आनंद विद्यालय पंचवीस धावांनी जिंकले होते. राम एकमेव अर्धशतकवीर ठरला होता. मराठा विद्यामंदिराचा कर्णधार जीवन व इतर खेळाडूं यांनी आनंद विद्यालयाच्या विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.

क्रीडांगणावरच खेळाडूंचा सत्कार व बक्षीस समारंभ आयोजित करण्यात आला. जिल्हापरिषदेचे अध्यक्ष श्री. वसंतराव कवठेकर हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक व क्रीडाशिक्षक आपापल्या आसनांवर स्थानापन्न झाले. सर्व खेळाडू चंदू व मावशी बैठकीवर पुढच्या रांगेत बसले होते. सगळ्यांनी रामचा गौरव केला. इतर खेळाडूंचेही अभिनंदन केले. सर्वांच्या आग्रहामुळे रामने उभे राहून आपल्या खेळातील यशाचे रहस्य 'लकी बॅट'चे कौतुक सर्वांना अभिमानाने सांगितले.

मग जिल्हा परिषदेचे अध्यक्ष भाषण करावयास उभे राहिले. ते म्हणाले,

"मुलांनो, तुमचे आजचे वय खेळण्याचे व अभ्यासाचे आहे. या दोहोंची सांगड घालून तुम्ही अशासाठी खेळा की, ज्यातून तुमचे स्वत:चे व्यक्तिमत्व खुलेल. तुमच्यातूनच आपल्या भारताचे उद्याचे यशस्वी क्रिकेटपटू निर्माण होणार आहेत. आजच्या सामन्याचा अर्धशतकवीर आनंद विद्यालयाचा कर्णधार राम नाईक याचे उदाहरण आपण लक्षात घेण्यासारखे आहे. त्याची २० २ 'लकी बॅट'वर कमालीची श्रद्धा आहे. प्रत्येकजण जर असा आपल्या ध्येयावर निष्ठा व श्रद्धा ठेवून काम करू लागेल